| अ.क्र. | तक्रार अर्जातील मुद्दा | शिक्षण अधिकारी यांचा अभिप्राय | चौकशी दरम्यान तक्रारकर्त्यांनी त्यावर केलेले भाष्य | चौकशी अधिका–याचा शेरा |
|---|---|---|---|---|
| १. | सदर निविदा प्रक्रीया राबवताना राज्य शासनाचा निर्णय क्रमांक भांरवस. १०८८ / ( २५१२ ) /उद्योग–६, दिनांक २ जानेवारी,१९९२ चे पालन शिक्षण मंडळाने केले आहे का ? | मुंबई प्राथमिक शिक्षण नियम १९४९ च्या तरतूदींना अधिन राहून यथास्थिती या शासन निर्णयांचे पालन शिक्षण मंडळाने केले आहे. | राज्यशासनाचे आदेश हे सर्व खात्यांनी पूर्ण शक्तीनिशी व प्रामाणिकपणे राबवायचे असतात. यथास्थिती व स्वत:च्या सोयीने राबवायचे नसतात. स्वत:च्या सोयीने ते राबविणे. म्हणजे राज्यशासनाच्या आदेशाचा अवमान करणे आहे.शिवाय मुंबई प्राथमिक शिक्षण अधिनियमातही राज्य शासनाचे आदेश,राजपत्रांचे पालन शिक्षण मंडळाने करणे आवश्यक असल्याचे म्हटले आहे. | **हा शासन निर्णय सर्व प्राधिकरणांना लागू आहे. त्यामुळे त्याचे पूर्णत: पालन होणे अपेक्षित आहे.** |
| २. | २ जानेवारी,१९९२ च्या शासन निर्णयानुसार वार्षिक खरेदी २००० रूपयांपेक्षा जास्त असेल तर शासन राजपत्रात जाहिरात देणे बंधनकारक आहे. त्याची पूर्तता शिक्षण मंडळाने केली आहे का? | याबाबत मुंबई प्राथमिक शिक्षण अधिनियमात तशी कोणतीही तरतूद नसल्याने यापुर्वी तशी कार्यवाही झालेली नाही.मात्र यापुढे तशी दक्षता घेण्यात येईल.मात्र १९९२ चे १०.८ शासन निर्णयानुसार जिल्हा व स्थानिक स्तरावरून प्रसिध्द होणा–या वृत्तपत्रात जाहिर निविदा प्रसिध्द करणेत आलेली आहे. | २ जानेवारी १९९२ च्या आदेशानुसार कार्यवाही करणे अनिवार्य असल्याबद्दल चे आदेश राज्य शासनाने ३० मार्च १९९४ रोजी निर्गमित केले होते. (पहा जोडपत्र १ –शासन आदेश क्र. भाखस–१०९४ /(२६७९)/उद्योग–६, मुद्दा क्र.१.१. ) | **उक्त शासन निर्णयाप्रमाणे कार्यवाही होणे अपेक्षित आहे.** |
| ३. | खरेदीसाठी शिक्षण मंडळाने निविदा समिती नेमली होती का? | मुंबई प्राथमिक शिक्षण नियम १९४९ चे नियम क्र.५५ ते ५९ नुसार निविदेबाबतचे अधिकार मा.सभापती व शिक्षण मंडळाचे असल्याने स्वतंत्र निविदा समिती गठीत करण्यात येत नाही.मात्र सर्व निविदांची कार्यवाही मा.शिक्षण मंडळाचे उपस्थितीत करण्यात येते. | निविदा समिती गठित केल्याशिवाय निविदा प्रक्रिया राबविणे योग्य नसते कारण या समितीतच त्या निविदा प्रक्रिये संदर्भातील तज्ज्ञ लोकांचा समावेश असतो. निविदेबाबतचे सर्व अधिकार जरी शिक्षण मंडळाला असले तरी ते कायद्याच्या चौकटीत राहूनच वापरावयाचे असतात. | **स्वतंत्र समिती नेमली नसून शिक्षण मंडळाचे त्या त्या वेळेच्या बैठकांद्वारे निर्णय घेतेल्याचे शिक्षण प्रमुख यांनी नमुद केले आहे. परंतु त्याची कार्यवृत्ते दिसून येत नाहीत.** |
| ४. | कोणत्याही कंपनीचे नाव देवून निविदा मागविता येतात का? कोणत्या कंपन्या नामवंत आहेत हे शिक्षण मंडळामध्ये कोणी व कशाच्या आधारावर ठरविले? | मुंबई प्राथमिक शिक्षण नियम १९४९ चे नियम क्र.५६ नुसार दस्तऐवज (स्पेसिफिकेशन) ठरविण्याचा अधिकार सभापतींना असल्याने मा.सभापती व शिक्षण मंडळ यांनी बाजारात प्रचलित असलेल्या दर्जेदार कापडाच्या कंपन्यांचा विचार करून कंपन्याची नावे ठरविलेली आहेत. | प्रश्नाचे उत्तर दिलेले नाही. शिक्षण मंडळाने ज्या बैठकिमध्ये नामवंत कंपण्यांची नावे ठरविली त्या बैठकिचा इतीवृत्तांत देणे आवश्यक आहे. शिवाय दस्तऐवज म्हणजे स्पेसीफिकेशन नव्हे. शिवाय कोणकोणत्या दर्जेदार कापडाच्या कंपन्यांचा विचार मंडळाने केला हे श्री.सुधाकर तांबे चौकशी अधिकाऱ्यांसमोर सांगू शकले नाहित. | **निर्णय शिक्षण मंडळाचे स्तरावर घेतल्याचे पुष्ट्यर्थ पुरावे अथवा कार्यवृत्त आढळून आलेले नाही. वास्तविक मा. मुख्य सभेचा ठराव ब्रॅण्डेड वस्तू घेणेसंबंधी असला तरी त्यांचे 'ब्रॅण्ड नेम' देखील निश्चित करणे यामुळे टेंडर प्रक्रिया सिमित झालेली आहे. ब्रॅण्ड नेम ठरवताना काय निकष लावले व ते कोणी लावले याबाबातचे कार्यवृत्त प्रकरणात दिसून येत नाही. तथापि हा निर्णय शिक्षण मंडळाचे स्तरावरून घेणेत आल्याचे शिक्षण प्रमुख यांनी मौखिक निवेदनात सांगितले.** |
| ५. | शासन निर्णयानुसार, पुरवठादारांना निविदा भरण्यासाठी तीन आठवडयांचा कालावधी देणे आवश्यक आहे, त्याची पूर्तता शिक्षण मंडळाने केली आहे का? | शिक्षण मंडळाने ठरविल्या प्रमाणे विद्यार्थ्यांना गणवेश व शालेय साहित्य वेळेत मिळण्यासाठी मध्यम मूदतीची निविदा मागविण्यात आली. मागील दोन वर्षे विद्यार्थ्यांना गणवेश मिळाले नसल्यामुळे २१ दिवसाचा निविदा कालावधी देता आलेला नाही. | शिक्षण मंडळाने निविदा भरण्यासाठी पुरेसा कालावधी दिला नाही. हा निर्णय कोणत्या बैठकीत घेतला त्याचा इतीवृत्तांत जोडलेला नाही. प्रत्यक्ष चौकशीच्यावेळी हा निर्णय शिक्षण मंडळाच्या बैठकीत घेण्यात आल्याचे सांगण्यात आले होते. परंतू | **शैक्षणिक साहित्य वेळेत विद्यार्थ्यांना मिळावे म्हणून मध्यम मुदतीची निविदा काढल्याचे शिक्षण प्रमुख यांचे म्हणणे आहे** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | १३ जुनला निविदांचे अ पाकीट उघडल्या नंतर वर्क ऑर्डर देण्यासाठी आणखी ४७ पेक्षा जास्त दिवसांचा कालावधी शिक्षण मंडळाला का लागला याचे उत्तर श्री तांबे देउ शकले नाहीत | |
| ६. | शासन निर्णयानुसार, निविदा उघडताना निविदाकारांना पूर्वसूचना देणे बंधनकारक आहे, त्याचे पालन शिक्षण मंडळाने केले आहे का? | निविदा पाकीट क्र.१ उघडताना सर्व संबंधित निविदा धारकांना पूर्वसूचना देवूनच त्यांचे समक्ष निविदा उघडण्यात आल्या आहेत. मात्र पाकीट क्र.१ उघडताना प्रयोगशाळेकडून प्राप्त झालेल्या तपासणी अहवालानुसार केवळ एकाच निविदाधारकाकडे नमूने पास होवून आल्याने व निविदा नोटीसमध्ये नामवंत कंपन्यांच्या साहित्याचा पुरवठा करण्याची निविदा असल्याने दोन जानेवारी १९९२ चे शासन निर्णय परिच्छेद क्र. ८ (४) नुसार तपासणी अहवालाची गरज नाही. तसेच एकाच निविदाधारकाचे निविदादर पाकीट उघडल्यास स्पर्धा होणार नाही व कदाचित किंमत अवास्तव असल्यास मंडळाची आर्थीक तोटा होईल ही बाब विचारात घेणेत आली. तसेच फेरनिविदा केल्यास पुन्हा उशिर झाल्यास विद्यार्थ्यांना साहित्य वेळेवर मिळणार नाही. या उदात्त हेतूने स्पर्धा, किमान दर, वेळेचा विचार, नामवंत वस्तू ( दर्जा ) मुंबई प्राथमिक शिक्षण नियम क्रमांक ५९ अन्वये दि.२१.७.२००८ च्या खास सभेत मा.अध्यक्ष, मा.उपाध्यक्ष व प्रत्येक सदस्याचे मत नोंदवून घेवून त्यावर मतदान घेणेत येवून १५ विरूध्द १ अशा बहुमताने त्याच सभेत निविदांचे दरपत्रक पाकीट क्र.२ उघडण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. | प्रश्नाचे उत्तर दिलेले नाही. 'ब' पॉकीट उघडताना निविदा भरणाऱ्यांना पूर्व सूचना दिल्या नसल्याचे तसेच ब पाकीट निविदा धारकांच्या समोर उघडले नसल्याचे श्री. तांबे यांनी मान्य व कबूल केले होते. २ जानेवारी १९९२ च्या शासन निर्णयातील परिच्छेद ८(४) चा चूकीचा अर्थ शिक्षण मंडळाने लावला.केवळ कापड म्हणजे संपूर्ण गणवेश नसतो आणि केवळ कागद म्हणजे संपूर्ण वही नसते याचा विसर शिक्षण मंडळाला पडला आहे. | **या संदर्भांत शिक्षण मंडळाचे स्तरावरून सारासार विचार करून बहुमतांनी निर्णय घेतला गेला आहे. तथापि पाकिट क्र २ उघडताना निविदाधारकांना आमंत्रित करणे नैसर्गिक न्यायाच्या दृष्टीने देखील अपेक्षित आहे.** |
| ७. | ज्या वस्तुंची खरेदी करावयाची आहे, त्यांचे एस्टीमेट व डिझाईन कोणी व कशाच्या आधारावर ठरविले? निविदा जाहिरात देण्यापूर्वी वस्तूच्या दरांच्या बाजारभावाची चौकशी केली होती का? | ज्या वस्तूची खरेदी करावयाची आहे, अशा वस्तु खरेदीच्या वार्षिक अंदाजपत्रकातील मंजूर तरतूद, लाभार्थी संख्या विचारात घेवून तसेच भांडार विभागाने प्रत्यक्ष बाजारात जाऊन बाजारभावांची केलेली खात्री यानुसार इस्टीमेट व डिझाईन ठरविण्यात आलेली आहे. | प्रश्नाचे उत्तर मिळाले नाही. प्रत्यक्ष बाजारभाव कोणी कोठे व केव्हा तपासले व त्याचे प्रमाण काय याचा कोठेही खुलासा नाही. भांडार विभागाने इस्टिमेट व डिझाईन ठरविले व बाजार भावांची खात्री केली म्हणजे नेमकी कोणी खात्री केली. भांडार विभागाला हे अधिकार कोणत्या बैठकीत देण्यात आले . त्या बैठकीचा इतीवृत्तांत दिलेला नाही. प्रत्यक्ष चौकशीच्या वेळी मात्र श्री. तांबे यांनी मंडळाने गणवेश महिला बचत गटाकडून तयार करुन घेतल्याचे सांगीतले होते. तसेच गणवेशाच्या बाबतीत ठराविक स्पेशीफिकेशन किंवा डिझाइन नसल्याचे मान्य केले होते. भांडार विभागाने बाजारक्भावासंदर्भात केलेल्या खात्रीचा अहवालही चौकशी अधिकाऱ्यांसमोर आला नाही.तसेच बाजारभावांची चौकशी शिक्षण मंडळाच्या सदस्यांनी केल्याचे त्यांनी सांगीतले होते. | **हा अत्यंत महत्त्वाचा मुद्दा आहे. वास्तविक खरेदी करणेपूर्वी नेमके कोणत्या प्रकारच्या वस्तू घ्यावयाच्या आहेत याबाबत त्या त्या क्षेत्रातील जाणकारांकडून बिनचूकपणे स्पेसिफिकेशन घेणे व बाजारातील वस्तूंचे दरही पडताळून घेणे अभिप्रेतच आहे. भांडार विभागाने यासंदर्भात केलेला कार्यालयीन पत्रव्यवहार प्रकरणात दिसून येत नाही.** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ८. | जाहिरातीमध्ये किंवा निविदा संचामध्ये किती वस्तू खरेदी करावयाच्या आहेत याचा उल्लेख दिसून येत नाही. खरेतर वस्तूच्या गुणवत्तेबरोबरच संखेवरही तिची किंमत ठरत असते, मग संखेचा उल्लेख का नाही? | उपलब्ध अंदाजपत्रकीय तरतूदींना अधिन राहून अंदाजे एकूण तरतूद किती आहे, त्याप्रमाणात १ टक्के बयाणा रक्कमेचा उल्लेख झालेला आहे. प्रत्यक्ष विद्यार्थी प्रवेश संख्येत बदल होण्याची शक्यता असल्याने बयाणा रककमेनुसार व निविदाधारक त्यांना परवडणा-या दरांच्या प्रमाणात विद्यार्थी संख्येचा अंदाज करीत असतो. त्यामुळे स्वतंत्र लाभार्थी संख्या नमूद केलेली नाही. यापुढे तशी दक्षता घेण्यात येईल. | दिलेले उत्तर प्रत्यक्ष चौकशीच्या वेळी दिलेल्या माहितीच्या बरोबर विरुध्द आहे. प्रत्यक्ष चौकशीच्या वेळी श्री.तांबे यांनी कबूल केले होते की, वस्तूंची संख्या ही ट्रॅडीशनली ठरविण्यात आली. व प्रत्यक्षात जाहिरातीत व निविदा संचा मध्ये वस्तूंच्या संख्येचा उल्लेख नाही. | **निविदा संचात संख्येचा उल्लेख असणे अपेक्षित आहे.** |
| ९. | ज्या निविदा नामंजूर करण्यात आल्या त्याची कारणे काय? ती कारणे २ जानेवारी १९९२ च्या नियमानुसार योग्य आहेत का? | ज्या निविदाधारकांच्या निविदा अटी-शर्तींची पूर्तता करू शकल्या नाहीत, व विहित कागदपत्र व पुराव्यांची पूर्तता झालेली नाही, अशा निविदा नियमानुसार नामंजूर करणेत आलेल्या आहेत. सदरची कारणे २ जानेवारी १९९२ च्या निर्णयानुसार ही कारणे योग्य आहेत. | दिलेले उत्तर पूर्णपणे चुकीचे व खोटे आहे. वस्तूत: श्री.तांबे यांनी चौकशीच्या वेळी अनेकवेळा असे कबुल केले आहे की, काही निविदा धारकांना ज्या कारणावरुन अपात्र ठरविण्यात आले त्याच कारणावरुन इतरांना मात्र अपात्र ठरविण्यात आलेले नाही. | **पात्र/अपात्रतेचे निकष मूळात व्यवस्थितपणे निश्चित केल्याचे दिसून येत नाहीत. तसेच छानणी तक्त्यामध्ये देखील तफावत दिसून येते. ज्या कामामुळे एका टेंडर धारकास अपात्र ठरविले आहे, तेच निकष अन्य टेंडर धारकास लागू न करता त्यास पात्र ठरविले आहे. विशेषत: शॉपॲक्ट मधील व्यावसायाचे स्वरूप या मुद्दयाशी प्रत्यक्ष व्यावहारिक अनुभवाची सांगड न घालता काही प्रकरणांत पात्र तर काही प्रकरणांत अपात्र ठरविले आहे. उदा- बूट मोजे खरेदी प्रकरणी गिरीफॅब माटुंगा यांचे शॉपॲक्ट गारमेंटचे आहे तरी त्यांना पात्र ठरविण्यात आले आहे व याच निविदेमध्ये समर्थ यांचे शॉपॲक्ट मध्ये फरक आहे म्हणून त्यांना अपात्र ठरविणेत आलेले आहे.** |
| १० | शासन परिपत्रक, दिनांक १४ ऑक्टोबर,१९८६ नुसार भारतीय मानक संस्थेने चिन्हांकित केलेल्या वस्तु खरेदी करणे बंधनकारक आहे व ज्या वस्तू चिन्हांकित केलेल्या नाहीत, त्यासंदर्भात दिलेल्या मार्गदर्शक सूचनांचे पालन शिक्षण मंडळाने केले आहे का? | १४ ऑक्टोबर,१९८६ व २ जानेवारी १९९२ च्या शासन निर्णयानुसार गणवेश-बुट-सॉक्स इ. वस्तुंची व लघुउद्योजक आणि उत्पादक कंपनीच्या निविदाधारकांच्या वस्तू व स्पर्धा करिता किमान दराने खरेदीची कार्यवाही करणेत आलेली आहे. | दिलेले उत्तर पूर्णपणे खोटे आहे. लघुउद्योगांना प्राधान्य मिळाले नाही. तसेच लघुउद्योगांसाठी व शासन अंगीकृत व्यवसायासाठी राखीव असलेले वस्तूंची खरेदी मोठ्या कंपण्यांकडून करुन २ जानेवारी १९९२ च्या आदेशाचे शिक्षण मंडळाने उल्घन केले आहे. | **लघु उद्योगांसाठी व शासन अंगीकृत व्यवसायासाठी राखीव असलेल्या वस्तूंच्या खरेदीसंबंधी १९९२ च्या शासन निर्णयाची पूर्तत: अंमलबजावणी झाली नसल्याचे दिसून येते.** |
| ११. | २ जानेवारी १९९२ च्या शासन निर्णयानुसार दोन लिफाफे पध्दतीसंदर्भात घ्यावयाची दक्षता शिक्षण मंडळाने घेतली आहे का? | दोन लिफाफे पध्दतीचे संदर्भात शिक्षण मंडळाने पूर्णत: दक्षता घेतलेली आहे. | दिलेले उत्तर पूर्णपणे खोटे आहे. श्री.तांबे यांनी चौकशीदरम्यान असे कबुल केले होते की, 'ब' लिफाफा उघडताना निविदादारांना बोलविण्यात आले नव्हते. तसेच 'ब' पाकीट उघडल्यानंतर पात्र निविदादारांची सही 'ब' लिफाफे बंद | **उक्त शासन निर्णयानुसार दोन लिफाफे पद्धतीसंदर्भात घ्यावयाची दक्षता शिक्षण मंडळाने पूर्णपणे घेतल्याचे आढळले नाही.** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | केलेल्या पाकीटावर घेतली नाही. | |
| १२. | कापड खरेदी, यंत्रमाग महाराष्ट्र राज्य महामंडळाकडून खरेदी करणे बंधनकारक असताना व महामंडळाने तशी तयारी दाखविली असतानाही त्याकडे दूर्लक्ष का करण्यात आले? | कापड खरेदी, यंत्रमाग महाराष्ट्र राज्य महामंडळाकडून खरेदी करण्यात आलेली नाही. कारण यंत्रमाग महाराष्ट्र महामंडळ केवळ कापडाचा पुरवठा करते. सदरचे कापड वेळेवर प्राप्त होत नाही. शिलाईसाठी स्वतंत्र निविदा प्रसिध्द कराव्या लागतात. आणि सदरचे गणवेश शाळांवार विद्यार्थ्यांच्या मोजमापानुसार पुरविणे अपेक्षित असते. त्यामुळे ही कार्यपध्दती महामंडळ अवलंबू शकत नाही व विद्यार्थ्यांना वेळेत साहित्य पुरवठा होवू न शकल्यास योजनेची उद्दिष्टे साध्य होणार नाहीत. या पूर्वानुभवानुसार मा.मनपा महासंभेने बँण्डेड कंपनीच्या वस्तुंची खरेदी करण्याचा निर्णय घेतला आहे. याउपर यंत्रमाग महामंडळाने निविदा प्रक्रीयेत सहभागी होणे आवश्यक होते. | दिलेले उत्तर खोटे आहे. चौकशीच्या वेळी श्री.तांबे यांनी असे सांगीतले होते की, यंत्रमाग महामंडळाकडून कापड पूरविण्याच्या बाबतीत आलेला अनुभव वाईट आहे. पूर्वी यंत्रमाग महामंडळाने पूरविलेल्या ४५ हजार मिटर कापडापैकी ४८ मिटर कापड खराब लागले होते. तसेच त्यांनी कापड पुरविण्यासाठी आठ महिन्यापेक्षा जास्त कालावधी लावला होता. यासंदर्भात पूराव्यादाखल काय कागदपत्र आहे असे विचारले असता? आपण सदर कागदपत्रे चौकशी समितीसमोर सादर करु असे त्यांनी कबुल केले होते. परंतु शेवटपर्यंत त्यांनी ती कागदपत्रे सादर केली नाहीत. थोडक्यात म्हणजे शिक्षण मंडळाने शासन अंगीकृत कंपनीला काळ्या यादीत टाकले आहे. राज्य शासनाच्या व्यवसायाला काळ्या यादीत टाकुन शिक्षण मंडळाने राज्य शासनाचा अवमान केला आहे. यंत्रमाग मंडळाकडून कापड खरेदी केल्यास गणवेश पुरविण्यास उशीर होतो असे त्यांनी आपल्या उत्तरात नमुद केले आहे. परंतु त्याच्या पृष्ठयर्थ कुठलाही पुरावा सादर केला नाही. इतकेच नव्हे तर यंत्रमाग महामंडळाचे कापडाचे स्पेशीफिकेशन शिक्षण मंडळाने अचानकपणे बदलले. हे स्पेशीफिकेशन बदलण्याचा निर्णय कोणत्या सभेत घेण्यात आला याचे उत्तर श्री.तांबे देऊ शकले नाही. इतकेच नव्हे तर यापूर्वी ब्रँडेड कंपनीचाही कापड खरेदीचा अनुभव वाईट आला होता. याचा उल्लेख मात्र सदरच्या उत्तरामध्ये कोठेही नाही. | **यासंदर्भात शिक्षण प्रमुख यांनी प्रत्यक्ष चर्चेत ४८००० मी पैकी ९४ मी कापड खराब निघाल्याचे तसेच पुरवठा वेळेत न केल्याचे नमुद केले आहे. यावरून यंत्रमाग मंडळाचा अनुभव खराब असल्याचे शिक्षण मंडळाने ठरविले असून मा. मुख्य सभेने ब्रॅण्डेड वस्तू घेणेचा ठराव केला आहे.** |
| १३. | लघुउद्योगांनी स्वत:च उत्पादित केलेल्या मालाचा पुरवठा करणे आवश्यक आहे. शिक्षण मंडळ खरेदी करत असलेल्या सर्वच वस्तू लघुउद्योगांसाठी आरक्षित आहेत. अशा स्थितीत सर्व निविदाकार स्वत:च उत्पादक आहेत, याची खातरजमा शिक्षण मंडळाने कशी करून घेतली? | मा पुणे मनपाच्या महासभेने अंदाजपत्रक मंजूरीच्या ठरावात दिलेले निर्देश विचारात घेवून शिक्षण मंडळ खरेदी करीत असलेल्या वस्तु लघुउद्योगासाठी आरक्षित असले तरी, मंडळाची स्पेसिफिक्रेशन, मोजमापे, शाळावार विद्यार्थी निहाय पुरवठा, याबाबतची कार्यपध्दती व वेळ याबाबींचा सांगोपांग विचार करून शिक्षण मंडळाने निविदा पध्दतीने खरेदी करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार निविदाकार हा स्वत: उत्पादक अथवा पुरवठादार असावा असे जाहिर निविदामध्ये प्रसिध्द करणेत आलेले होते. त्यामुळे तशी खातरजमा करणेत आलेली नाही. परिच्छेद क्र. ९२ च्या ८.४ नुसार प्रक्रीया पुर्ण के ली आहे. | दिलेले उत्तर पूर्णपणे चुकीचे व खोटे आहे. खरे तर निविदा प्रक्रिया राबवितांना ज्या कंपनीकडून मालाचा पुरवठा होणार आहे त्या कंपनीची संपूर्ण छाननी करणे आवश्यक आहे. या छाननी मध्ये पुरवठादार कंपनीची क्षमता, त्यांच्याकडची यंत्रसामग्री वगैरे अनेक गोष्टींचा समावेश असतो. परंतु तशी छाननी न केल्यामुळे २ जानेवारी १९९२ च्या आदेशाचे उल्लंघन झाले आहे. याचप्रमाणे पुणे मनपाच्या महासभेने फक्त गणवेश खरेदीच्या बाबतीत ब्रँडेड कंपनीचा गणवेश घ्यावा असे नमुद केले होते. शिवाय त्या ठरावाला आयुक्तांनी मंजुरी दिली नव्हती त्यामुळे त्याचे पालन करण्याची अगदी आवश्कता होती असे नाही. शिवाय गणवेश खरेदीतही शिक्षणमंडळाने फक्त कापड ब्रँडेड कंपनीचे घेतले आहे. गणवेशामध्ये गणवेशाचे डिझाईन त्याची शिलाई, बटने, | **ब्रॅण्डेड वस्तू खरेदी करणेबाबत मा. मुख्य सभेचा ठराव आहे. तथापि शिक्षण मंडळाच्या स्तरावरून ब्रॅण्ड नेम देखील ठरवले गेल्याने टेंडर प्रक्रिया सिमीत झाली आहे. शिलाईबाबत काय निकष असावेत याबाबत शिक्षण मंडळाचे स्तरावरून पूर्वविचार झाल्याचे दिसत नाही. तसेच निविदा अटी प्रमाणेच प्रत्यक्ष मालाचा पुरवठा होत आहे किंवा कसे याची पडताळणी करण्याची यंत्रणा स्थापित केलेली नाही.** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | कॉलर अशा अनेक गोष्टींचा समावेश होतो. त्यामुळे शिक्षण मंडळाने ब्रँडेड गणवेश घेतला आहे. असे म्हणणे योग्य ठरणार नाही.तसेच चौकशी अधिकाऱ्यांसमोर तांबे यांनी निविदा धारकांच्या विश्वासार्हतेची तपासणी केली नसल्याचे कबूल केले होते. | |
| १४. | जानेवारी १९९२ च्या शासन निर्णयानुसार गणवेश (रेडीमेड गारमेंट्स ) लेदर व पी.व्ही.सी. शूज, वहया, पाटया, कॅाटन होजिअरी, लेखन साहित्य, रेखा व गणिती उपकरणे इत्यादी वस्तू लघूउद्योगांकडून खरेदी करणेसाठी आरक्षित आहेत (परिशिष्ट ११) या बाबीचा विचार निविदा प्रक्रीया राबवताना केला का? | मा पुणे मनपाच्या महासभेने अंदाजपत्रक मंजूरीच्या ठरावात दिलेले निर्देश विचारात घेवून शिक्षण मंडळ खरेदी करीत असलेल्या वस्तु लघुउद्योगासाठी आरक्षित असले तरी, मंडळाची स्पेसिफिकेशन, मोजमापे, शाळावार विद्यार्थी निहाय पुरवठा, याबाबतची कार्यपध्दती व वेळ याबाबींचा सांगोपांग विचार करून शिक्षण मंडळाने निविदा पध्दतीने खरेदी करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार निविदाकार हा स्वत: उत्पादक अथवा पुरवठादार असावा असे जाहिर निविदामध्ये प्रसिध्द करणेत आलेले होते. त्यामुळे तशी खातरजमा करणेत आलेली नाही. परिच्छेद क्र. ९२ च्या ८.४ नुसार प्रक्रीया पुर्ण के ली आहे. | राज्य शासनाने ज्या वस्तू लघुउद्योगासाठी व इतर संस्थांसाठी राखीव ठेवल्या आहेत त्या मागचा हेतू राज्यातील बेरोजगारांना उद्योग मिळावा, राज्यात रोजगार–व्यवसाय वाढीस लागावा हा आहे. टेंडर मागवून परराज्यातील मोठ्या उद्योगाच्या वस्तू मध्यस्थामार्फत स्विकारणे गैर आहे.गणवेशाच्या बाबतीत तर मोजमापांचा कुठेही दुरान्वयानेही विचार केल्याचे आढळून येत नाही. | **यासंदर्भात १९९२ च्या शासन निर्णयानुसार कार्यवाही न करणेची कारणमिमांसा प्रत्यक्ष प्रकरणात दिसून येत नाही.** |
| १५ | गणवेशाच्या बाबतीत अंतीम उत्पादन म्हणजे, प्रत्यक्ष शिक्षण मंडळाच्या स्पेसिफिकेशनप्रमाणे तयार करण्यात आलेला गणवेश प्रयोगशाळेकडे तपासणीसाठी पाठविणे आवश्यक होते. कारण गणवेशामध्ये कापडाबरोबरच गणवेशाचे डिझाईन, त्याला कोठे किती खिसे असणार, शिलाई कोणत्या धाग्याने करणार, प्रत्येक सेंटीमीटर अंतरावर शिलाईचे किती टाके असणार, टीप्स किती असणार, त्याला बटणे किंवा झिप कोणत्या कंपनीची असणार, कॅालर कोणती वापरणार हे ही तितकेच महत्वाचे आहे आणि त्याची तपासणीही आवश्यक आहे. असे असतानाही फक्त कापड प्रयोगशाळेत पाठविण्यात आल्याचे दिसून येते. ज्या कंपनीला गणवेशाचे कंत्राट देण्यात आले, त्या कंपनीचा कापडाचाही नमुना नापास झाला आहे आणि इतर बाबींची तपासणी झालीच नाही, असे का? याचाही खुलासा मंडळाकडून घ्यावा. | निविदा अटी–शर्तीला नमूद केल्याप्रमाणे अंतीम उत्पादन – म्हणजेच प्रत्यक्ष तयार गणवेश हे गणवेश ताब्यात घेताना प्रयोगशाळेत तपासून घेण्यात येणार आहेत. नामांकित कंपनीचे कापडे खरेदीची कार्यवाही असल्याने लॅब मधून तपासून घेण्याची नियमानुसार आवश्यकता नव्हती. तसेच गणवेशाचे स्पेसिफिकेशन कार्यालयात पाहणीसाठी उपलब्ध करून देणेत आलेले आहे. त्यामुळे त्यानुसार तपासणी झालेनंतरच मालाचे वाटप करणेत येणार आहे. त्यामुळे आवश्यकतेप्रमाणे तपासणी झाली नाही, असे म्हणता येणार नाही. | दिलेले उत्तर धादांत खोटे आहे. श्री.तांबे यांनी चौकशी दरम्यान आपल्या उत्तरात गणवेशाचे स्पेसीफिकेशनच केले नसल्याचे कबुल केले होते. त्यामुळे स्पेसीफिकेशन कार्यालयात पाहणीसाठी उपलब्ध करुन दिलेले आहे. हे त्यांचे उत्तर हस्यास्पद आहे. कारण नुसताच गणवेशाचा आकार पाहून विद्यार्थ्यांसाठी गणवेश शिवता येतील हे पटत नाही. गणवेशाची ऑर्डर देतांना त्यांची साईज देणे आवश्यक असते. ती साईज नविदा धारकांना दिल्याचा उल्लेख निविदा संचात किंवा जाहिरातीत कुठेही उल्लेख नाही. शिवाय ज्या कंपनीचा नमुना नापास झालेला आहे आणि गणवेशातील इतर बाबींची तपासणी झालीच नाही त्याच कंपनीकडून नमुना तपासून घेणे कितपत संयुक्तीक आहे. | **तक्रारदारांनी दिलेल्या अभिप्रायाशी सहमत आहोत. तसेच तपासणी करूनच वाटप करणेत येणार आहे, हा खुलासादेखील असंयुक्तिक आहे. कारण इतक्या मोठ्या प्रमाणावर गणवेश शिवून झाल्यावर मग तपासणी करून घेणे व शिवलेले गणवेश स्विकारणे अथवा नाकारणे ही बाब व्यावहारिक दृष्टया अशक्य आहे.** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १६ | कोणती वस्तू कोणत्या प्रयोगशाळेकडे पाठवायची याचा निर्णय कोणी आणि कशाच्या आधारावर घेतला? | कोणती वस्तू कोणत्या प्रयोगशाळेकडे पाठवावी याचा निर्णय मा.सभापती व शिक्षण प्रमुख, शि.मं. पुणे मनपा यांनी २ जानेवारी,१९९२ मध्ये निर्देशित शासनमान्य प्रयोगशाळेंच्या आधारावर घेण्यात आला. | दिलेले उत्तर खोटे आहे. २ जानेवारी १९९२ च्या शासन निर्णयामध्ये प्रत्येक प्रयोगशाळेपुढे त्या प्रयोग शाळांमध्ये कोणत्या वस्तूंची तपासणी केली जाईल याचा उल्लेख आहे. शिक्षण मंडळाने गणवेश व बुट यांची तपासणी ज्या प्रयोगशाळांकडे पाठविली त्यांच्याकडे संबंधित वस्तूची तपासणीचे अधिकार नसल्याचे दिसून येते. या संदर्भात शासनाने १९९२ नंतर काही आदेश निर्गमित केले आहे का? अशी विचारणा केली असता, श्री.तांबे यांनी त्याबाबतीत आपल्याला काहीही माहित नसल्याचे सांगीतले. तसेच याच प्रयोगशाळांकडे वस्तू पाठविण्याचा निर्णय ज्या शिक्षण मंडळाच्या बैठकीत देण्यात आला. त्याचा इतीवृत्तांत जोडलेला नाही. | **ज्या संस्थांना जे साहित्य तपासणेचे अधिकार सुपूर्त केलेले आहेत त्याची सविस्तर माहिती उक्त शासन निर्णयात आहे. त्याचे अवलोकन केले असता रेल इंडिया टेक्निकल ॲण्ड इकोनॉमिक्स सर्व्हिसेस या कंपनीस केवळ लोखंड व पोलादी वस्तूंचे नमूने तपासणेचे अधिकार असताना त्यांचेकडे रबर व पीव्हीसी व बूट तपासणेस पाठवणेत आलेले आहेत, ही बाब संयुक्तिक वाटत नाही.** |
| १७ | प्रयोगशाळेकडे पाठवायच्या वस्तूंना संकेतांक कोणी दिले? | प्रयोगशाळेकडे पाठवावयाच्या वस्तुंना देण्यात आलेले संकेतांक स्वत: शिक्षण प्रमुख व सभापती, शि.मं. पुणे मनपा यांनी दिलेले आहेत. | शिक्षण प्रमुख व सभापती यांना प्रयोग शाळेकडे पाठवायच्या वस्तूंना सांकेतांक देण्याचे अधिकार कोणत्या बैठकीत देण्यात आले. त्याचा खुलासा करण्यात यावा. | – |
| १८ | वहयांच्या बाबतीत जाहिरातीत फक्त सुदर्शन कंपनीच्या वहया मागविण्यात आल्या. नंतर शुध्दीपत्रकात आणखी काही कंपन्याचा समावेश करण्यात आला. हा निर्णय कोणी व कशाच्या आधारे घेतला? वहयांसाठी फक्त एच.पी.सी. या एकाच कंपनीच्या कागदाचा आग्रह का धरण्यात आला? वहयांची निविदा मागवताना भारतीय मानक संस्थेने दिलेल्या चिन्हांकाचा विचार केला का? | वहयांच्या जाहिरातीमध्ये अगोदर एकाच–सुदर्शन कंपनीच्या वहया नामांकित कंपनी म्हणून घेण्याचे मंडळाने ठरविले होते. मात्र स्पर्धा व्हावी व नियमानुसार एकाच कंपनीच्या निविदा नियमानुसार मागविता येत नाही, ही बाब लक्षात आल्यानंतर अन्य नामवंत कंपन्याचाही निविदेत समावेश करण्यात आला. हा निर्णय मा.सभापती, शिक्षण मंडळ सदस्य व शिक्षण प्रमुखांनी मुंबई प्राथमिक शिक्षण नियम १९४९ चे नियम ५६ प्रमाणे घेण्यात आला व वहयांसाठी शासकीय कागद कंपनीचा विचार करून एच पी सी या एकाच कंपनीच्या कागदाचा आग्रह धरणेत आला. वहयांची निविदा मागविताना रजिस्टर्ड ट्रेडमार्क असलेल्या वहया व ५४ जी एस एम या नामांकित कागदाचा विचार करून निविदा प्रसिध्द केली आहे. | दिलेले उत्तर खोटे आहे. निविदा स्पर्धा कशामध्ये व्हावी हे शिक्षण मंडळाने स्पष्ट केलेले नाही. नियमानुसार एकाच कंपनीच्या वस्तू साठी निविदा मागविता येत नाही. हे जर लक्षात आले होते तर दुरुस्ती करताना फक्त नामवंत कंपन्या एवढाच उल्लेख करणे योग्य ठरले असते. सुरुवातीला एकाच सुदर्शन कंपनीचे नाव टाकण्याचा आणि नंतर इतर दोन तीन कंपन्याचे नाव टाकण्याचा निर्णय ज्या बैठकीत घेण्यात आला त्या बैठकीचा इतीवृत्तांत चौकशी समितीसमोर आलेला नाही. तसेच वह्यांसाठी एच.पी.सी. या एकाच कंपनीच्या कागदाचा आग्रह ती कंपनी शासकीय असल्याने धरण्यात आला असे म्हटले आहे. परंतु आज बाजारामध्ये अनेक शासकीय कंपन्या कागदाच्या व्यवसायामध्ये आहे. उत्तरामध्ये भारतीय मानक संस्थेच्या चिन्हांकाचा विचार केला होता का? याचेउत्तर दिलेले नाही. सुदर्शन हा रजिस्टर ब्रँड आहे याची खातर जमा शिक्षण मंडळाने कशी करुन घेतली? याचाही खुलासा केलेला नाही.. | **ब्रॅण्डेड वस्तू घेणेचा जरी निर्णय झाला असला तरी ब्रॅण्ड नमूद करून टेंडर प्रक्रिया सिमित करणे ही बाब संयुक्तिक नाही. कारण ब्रॅण्डेड कंपन्या अनेक असताना त्यापैकी विशिष्ठ कंपन्यांचीच नावे टेंडरसाठी नमूद करणे समर्थनीय वाटत नाही.** |
| १९ | वहयांबाबतच्या निविदा संचामध्ये कोणा एकाच कंपनीच्या दरपत्रकाचा उल्लेख आहे असे का? | वहयाबाबतच्या निविदासंचामध्ये ज्या एका कंपनीने एकापेक्षा अधिक निविदाधारकांना अधिकारपत्र दिलेले असल्याने एकाच कंपनीच्या दरपत्रकांचा उल्लेख दिसून येत आहे . | हे उत्तर म्हणजे खोटेपणाचा आणि शिक्षण मंडळाच्या सदस्याचे निविदा धारकांशी संगनमत झाल्याची कबूली आहे.या उत्तराचा स्पष्ट अर्थ असा आहे की सुदर्शन कंपनीने एका पेक्षा अधिक निविदा धारकांना प्राधिकारपत्र दिल्याची कल्पना शिक्षण मंडळाला निविदा छापण्यापूर्वीच होती व सुदर्शन शिवाय इतर कंपनीची निविदा स्विकारायची नाही हे आधिच ठरले | **शुद्धीपत्रक दिल्यानंतर वास्तविक टेंडर संचामध्ये त्या अनुषंगाने फेरबदल व दुरूस्त्या करणे आवश्यक होते. परंतु तसे केल्याचे दिसून येत नाही.** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | होते, निविदा संचामध्ये सुदर्शन या एकाच कंपनीच्या नावाचा उल्लेख आहे. नंतर शुध्दीपत्र देऊन जाहिरातीत सुधारणा करण्यात आली होती तर ती सुधारणा निविदा संचात का केली नाही? ज्या एका कंपनीच्या नावाचा उल्लेख सुरुवातीला जाहिरातीत करण्यात आला त्याच कंपनीच्या पुरवठा दाराला काम मिळाले हा योगायोग म्हणावा की कटकारस्थान? एकापेक्षा अधिक निविदाधारकांना सुदर्शन कंपनीने अधिकार पत्र दिलेले असल्याने सगळ्यात शेवटचे अधिकारपत्र ग्राह्य धरुन इतर निविदाधारकांचे 'ब' पाकीट न उघडणे कायद्यानुसार योग्य ठरले असते. परंतु सुदर्शनलाच कॉन्ट्रक्ट द्यायचे या हट्टहासापोटी सर्व प्राधिकारपत्रे ग्राह्य धरल्याचे दिसून येते. शिवाय सुदर्शन कंपनीची प्राधिकार पत्र शिक्षणमंडळाची निविदा जाहिर होण्यापूर्वी तीन महिणे आधी शिक्षण प्रमुखांचे नावे तयार केल्याचे दिसून येते. शिवाय जो मजकुर सुदर्शन कंपनीने वापरला आहे तोच मजकुर निविदा संचामध्ये अधिकार पत्रासाठी जसाच्या तसा आल्याचे दिसून येते व त्यातूनच निविदा प्रक्रियेमध्ये कटकारस्थान रचल्याचे लक्षात येते. शिवाय शिक्षण मंडळाने प्राधिकारपत्राच्या नमुन्यामध्ये ते प्राधिकारपत्र कोणत्या नोटीससाठी आहे याचा उल्लेख केलेला आहे. त्यामुळेएका वस्तूसाठी एका उत्पादकाचे प्राधिकारपत्र एकाच पुरवठादाराकडे असणे आवश्यक आहे. एकाच उत्पादन कंपनीच्या दोन दोन तीन तीन पुरवठा दारांची अधिकारपत्रे ग्राह्य धरुन त्यांना पात्र ठरविले आहे. हा निविदा प्रक्रीयेमध्ये घोटाळा झाल्याचा पुरावा आहे | |
| २० | पाटयांच्या बाबतीत फक्त के.डी.राजदूत कंपनीच्याच पाटया मागविण्यात आल्या आहेत. बाजारात इतर कंपनीच्या पाटया नाहीत का? एकाच कंपनीच्या पाटया मागवायच्या तर मग निविदेची गरज काय होती? तसाच प्रकार सिसपेन्सील, कंपास पेटी व आराखडा वहयांच्या बाबतीत आहे. शिवाय या वस्तू २ जानेवारीच्या १९९२ शासननिर्णयानुसार विविध प्रकारच्या शासकीय व अशासकीय संस्थांकडून खरेदीसाठी आरक्षित आहेत. | पाटयांच्याबाबतीत यापूर्वी केडी राजदूत या कंपनीच्याच पाटया खरेदीचा अनुभव व त्या पाटयांचा दर्जा, किंमत व उपयोगिता यांचा विचार करूनच दर्जेदार वस्तू म्हणून त्याच कंपनीच्या पाटया तसेच नामांकित कंपनीच्या सिसपेन्सील, कंपासपेटी, आराखडा वही, हयाही नामांकित कंपनीच्या वस्तुंच्या खरेदीचा निर्णय मुंबई प्राथमिक शिक्षण नियम १९४९ चे नियम ५६ ड नुसार घेण्यात आलेला आहे. रूपये ५०,००० पुढील खरेदीवर निवेदिता काढणे बंधनकारक आहे. म्हणून के डी राजदूतची निविदा काढली व त्यांना योग्य प्रतिसाद मिळाला. | शिक्षण मंडळाचे हे उत्तर म्हणजे भोंगळपणाचा कळस आहे. यापूर्वीचा मुद्दा क्र.१८ मध्ये एकाच कंपनीची निविदा नियमानुसार मागविता येत नाही हे त्यांनी कबुल केल आहे. आता मात्र दर्जा /उपयोगीता वगैरे वगैरे गोष्टींचा उल्लेख करुन आपण निविदा प्रक्रिया राबविताना किती भोंगळपणा केला आहे हे सिध्द करुन दाखविले आहे. त्याचप्रमाणे या मुद्यातील बऱ्याच वस्तू या सहकारी, शासकीय व अशासकीय संस्थाकडून खरेदी करण्यासाठी २ जाने. १९९२ च्या आदेशानुसार राखीव आहेत. त्याचेही शिक्षण मंडळाने उल्लंघन केले आहे. आराखडा वही ही कोणत्या ब्रँडेड कंपनीची आहे याचा खुलासा शिक्षण मंडळाने केलेला नाही. | **शिक्षण मंडळाचा खुलासा परस्परविरोधी आहे. टेंडर प्रक्रिया राबविताना कोणाही एका पुरवठादारास अप्परहॅण्ड मिळू नये अशी परिस्थिती राखणे अत्यावश्यक आहे व तो टेंडर प्रक्रियेचा गाभा आहे.** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २१ | अनेक पुरवठादारांनी एकाच उत्पादकाचे आपण अधिकृत पुरवठादार असल्याचे पत्र सादर केले आहे व कंपनी आपल्याच उत्पादनाला जबाबदार असल्याचे म्हटले आहे. शिक्षण मंडळाने या पत्रांची खातरजमा कशी करून घेतली? | संबंधित कंपनीच्या अधिकृत पत्र तसेच संबंधित कंपनीच्या व्यवस्थापकांशी दूरध्वनीवरून खात्री करून घेण्यात आलेली आहे. | याचा अर्थ शिक्षण मंडळाचा कोणीतरी सदस्य किंवा अधिकारी निविदा प्रक्रिया सुरू असताना विविध कंपन्यांच्या संपर्कात होता.एकाच उत्पादकाचे प्राधिकारपत्र अनेक पुरवठादारांनी सादर केल्यानंतर सगळ्यात शेवटच्या पुरवठाधारकाचे पत्रे ग्राह्य धरणे आवश्यक होते. परंतु त्याऐवजी पुरवठा दारांवर अतिप्रेम दाखवत शिक्षण मंडळाच्या कोणीतरी संबंधित उत्पादक कंपन्यांशी दूरध्वनीवरुन संपर्क साधून प्राधिकार पत्राची खात्री करुन घेतल्याचे सांगीतले पण ही खात्री कोणी करुन घेतली याचा उल्लेख कोठेही नाही. त्याचे नाव रेकॉर्डवर येणे आवश्यक आहे. तसेच या उत्पादकांचा नमुना नापास झाल्यानंतर त्या उत्पादकांवर काय कारवाई केली याचाही खुलासा होणे आवश्यक आहे. तसेच शिक्षण मंडळाच्या ज्या कोणी उत्पादकाशी संपर्क साधला त्यांचा संपूर्ण अहवालही सादर होणे आवश्क आहे. | **कंपनीने दिलेली अधिकारपत्रे सशर्त आहेत उदा. सुदर्शन कंपनीची दि. ४.०२.०८, दि. २४.०२.०८, दि. ५.०४.०८ व दि. १८.०५.०८ ची अधिकारपत्रे पाहता त्यामध्ये त्या दिनांकास त्या पुरवठादारास दिलेली प्राधिकारपत्रे वगळता अन्य प्राधिकारपत्रास कंपनी जबाबदार राहणार नाही असे स्पष्टपणे नमूद केले आहे. म्हणजेच शेवटच्या दिनांकास दिलेले प्राधिकारपत्र फक्त वैध ठरु शकते. ही बाब विचारात घेता अन्य पुरवठादारांना अपात्र ठरवणे क्रमप्राप्त होते. परंतु दूरध्वनीवरून खात्री करून समोरिल कागदपत्रांशी विसंगत निर्णय घेणे ही बाब प्रशासकिय दृष्ट्या आक्षेपार्ह आहे.** |
| २२ | शिक्षण मंडळाच्या स्पेसिफिकेशनप्रमाणे एकाच कंपनीने वेगवेगळ्या पुरवठादारांमार्फत आपल्या उत्पादनाचे नमुने सादर केले, त्यातील काही नमुने प्रयोगशाळेत अयोग्य ठरले. याचा अर्थ १) कंपन्यांनी वेगवेगळ्या पुरवठादारांमार्फत वेगवेगळे नमुने सादर केले. २) पुरवठादारांनी संबधित कंपनीचा नसलेला माल व कंपनीचे खोटे प्राधिकार पत्र सादर केले किंवा ३) प्रयोगशाळेच्या तपासणी प्रक्रीयेमध्ये काहीतरी घोटाळा आहे. यातील खरे काय? | वस्तुस्थिती दर्शक पुरावे व प्रयोगशाळेचे तपासणी अहवाल व एकाच पुरवठादाराचे पास झालेले साहित्याचे नमुने यांचा विचार करता प्रयोगशाळेच्या तपासणी प्रक्रीयेमध्ये काहीतरी घोटाळा आहे, हे खरे आहे व त्यास अनुसरूनच शिक्षण मंडळाने खरेदीची कार्यपध्दती बदलण्याचा धाडसी निर्णय मुंबई प्राथमिक शिक्षण नियम १९४९ मधील ५६ ड नुसार घेतलेला आहे. | प्रयोग शाळेच्या तपासणी प्रक्रियेमध्ये काहीतरी घोटाळा आहे हे शिक्षण मंडळाने कबुल केले. त्यातच शिक्षण मंडळाच्या अनागोंदी कारभाराचे दर्शन होते. प्रयोग शाळेच्या अहवालामध्ये गडबड असेल तर त्यापूर्वी शिक्षण मंडळाने दिलेल्या सांकेतांकामध्ये गडबड आहे हे निश्चित कारण, सांकेतांक फुटल्याशिवाय प्रयोग शाळेच्या प्रक्रियेमध्ये घोटाळा होऊ शकत नाही.<br>खरेदीची प्रक्रिया बदलण्याचा शिक्षण मंडळाने घेतलेला निर्णय हा धाडसी नव्हे तर कटकारस्थान, भ्रष्टाचार, यांना खतपाणी घालणारा व सामान्य विद्यार्थ्यांच्या माथी निकृष्ट वस्तूंचा पुरवठा करण्यास प्रोत्साहन देणारा आहे. शिवाय ज्या प्रयोग शाळाच्या अहवालाबद्दल शिक्षण मंडळाला शंका आहे त्यांच्याबद्दल शिक्षण मंडळाने संबंधित प्रयोगशाळांकडे कोणतीही तक्रार केल्याचे दिसत नाही. या प्रयोगशाळांकडे वस्तू तपासणीसाठी पाठविण्याचा निर्णय शिक्षण मंडळाने स्वत:च घेतला, परंतु अहवाल आल्यानंतर मात्र दोन्ही प्रयोग शाळांच्या तपासणी प्रक्रियेमध्ये काहीतरी घोटाळा असल्याचा साक्षात्कार मंडळाला झाला. याचा अर्थ काही ठराविक पुरवठा दारांचे नमुने पास होऊन येतील अशी आशा मंडळाला होती. परंतु तसे न घडल्यामुळे त्या प्रयोगशाळांचा अहवाल शिक्षण मंडळाला चुकीच्या व संशयास्पद वाटला. | **ज्या प्रयोगशाळेकडून तपासणी करणेचा निर्णय शिक्षण मंडळाने घेतला होता त्या प्रयोगशाळेच्या कार्यपद्धतीबाबत अहवाल प्राप्त झालेनंतर विपरित भाष्य करणे संयुक्तिक नाही. तसेच त्या प्रयोगशाळेच्या कार्यपद्धतीबाबत असमाधान असल्यास शिक्षण मंडळाने पुढे अन्य प्रयोगशाळेकडून नमूने तपासून घेणे अथवा त्या प्रयोगशाळेकडे फेरअभिप्राय / अथवा खुलासा मागवणे अभिप्रेत होते. परंतु असे झाल्याचे दिसून येत नाही.** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २३ | बूटांच्या खरेदीच्या बाबतीत लिबर्टी व बाटा या दोनच कंपन्याचे नमुने प्रयोगशाळेकडे पाठविण्यात आले खरेतर नियमानुसार तीन निविदाकार नसल्याने नमुने प्रयोगशाळेकडे न पाठविता फेरनिविदा मागविणे आवश्यक होते. तसे न करता उलट नमुना नापास झाल्यानंतरही बाटा व लिबर्टी शूज कंपनीची निविदा का उघडण्यात आली? | लिबर्टी वबाटा या दोन कंपन्याचे मात्र बाटा कंपनीचे दोन वेगवेगळे निविदाधारक ( पद्मयोग व गिरीफॅब ) व लिबर्टी ही उत्पादक कंपनी यांचा एक असे तीन निविदाधारकांचे नमुने प्रयोगशाळेत तपासणीला पाठविण्यात आलेले होते,ही वस्तुस्थिती होती. त्यामुळे मुंबई प्राथमिक शिक्षण नियम १९४९ मधील नियम ५६ ड नुसार या निविदा उघडण्यात आल्या आहेत. | शिक्षण मंडळाचे हेही उत्तर त्यांच्या भोंगळ कारभाराचे द्योतक आहे. लिबर्टी कंपनीचा मुलींसाठीचा एक बुटाचा जोड आणि बाटा या कंपनीचे पण दोन वेगवेगळा पुरवठादारांचे मुलांसाठीचे दोन जोड प्रयोग शाळेला पाठवुन त्यांच्यामध्ये स्पर्धा दाखविणे हास्यास्पद आहे. पहिली गोष्ट म्हणजे मुलींचे बूटांचे जोड व मुलांचे बुटांचे जोड यांच्यामध्ये तुलना होऊ शकत नाही. दुसरी गोष्ट लिबटी व बाटा या दोनच कंपन्या असल्यामुळे फेरनिविदा मागविणे आवश्यक होते. तिसरी गोष्ट लिबर्टीचा नमुना नापास झालेला होता. | **सर्व जोडयांचे नमूने व्यवस्थितरित्या प्रयोगशाळेकडे पाठवून त्या त्या संवर्गातील नमून्यांची तुलना करून अभिप्राय प्राप्त करून घेणे अभिप्रेत होते. परंतु विसंगत संवर्गाची तुलना करून निष्कर्ष स्विकृत केल्याचे दिसते.** |
| २४ | पद्मयोग व गिरीफॅब या कंपन्यांनी तांत्रिक निविदा उघडल्यानंतर म्हणजे १३ जून नंतर प्राधिकार पत्रे सादर केल्याचे दिसून येते. | पाकीट क्र.१ उघडल्यानंतर संबंधित कंपनीच्या प्राधिकार पत्रामध्ये दिनांक व पत्त्यामध्ये खाडाखोड दिसून आल्याने व कंपनीचे लेटरहेड संशयास्पद वाटल्याने व स्पर्धा होण्यासाठी संबंधितांना कंपनीचे अधिकृत पत्र फेरसादर करणेबाबत दोघांनाही निविदा उघडण्याचेवेळी कळविण्यात आले होते, व दूरध्वनीवरून संबंधित कंपनीच्या सक्षम प्राधिका-याकडे खात्री करून १३ जून नंतर प्राधिकार पत्रे सादर करण्यात आली. | पाकीट क्र. १ उघडल्यानंतर जी संधी पद्मयोगला देण्यात आली तीच संधी इतर निविदा धारकांना दिल्याचे दिसून येत नाही. व गिरीफॅब व पद्मयोग या दोघांनाही फेरप्राधिकारपत्र सादर करावयास सांगणे चुकीचे होते. कारण दोन्ही पैकी कोणाच्या तरी एकाच्याच नमुन्याला कंपनी जबाबदार राहणार होती. त्यामुळे सगळ्यात शेवटी ज्याचे पत्र आले त्यांचेच प्राधिकारपत्र ग्राह्य धरणे आवश्यक होते. तसेच चौकशीच्या वेळी फक्त एकाच कंपनीकडून फेरप्राधिकारपत्र मागविण्यात आल्याचे दिसून येते. | **शिक्षण मंडळाचा खुलासा सकृतदर्शनी स्विकार्हाय आहे. परंतु ही सवलत अन्य अपात्र निविदाधारकांना दिली नसून त्यांना थेट अपात्र ठरविले आहे.** |
| २५ | चूकीच्या पध्दतीने तरीही फक्त बाटा आणि लिबर्टी मध्ये निविदा स्पर्धा झाली हे कितपत योग्य आहे? | मुंबई प्राथमिक शिक्षण नियम १९४९ मधील नियम ५६ ड नुसार बाटा व लिबर्टीच्या तीन निविदाधारकांची दरपत्रके उघडण्यात आल्याने योग्य स्पर्धा झालेली आहे. | बहुतेक आपण काय करत आहोत? याचा शिक्षण मंडळाला विसर पडला आहे. शिक्षण मंडळाला निविदा स्पर्धा पुरवठा दारांमध्ये करावयाची होती की उत्पादनांच्या दर्जामध्ये मध्ये करावयाची होती याबाबतीत शिक्षण मंडळ गोंधळात पडलेले दिसते. | - |
| २६ | या सर्व निविदा प्रक्रीयेसंदर्भात शिक्षण मंडळ सदस्यांनी व अधिका-यांनी कोणकोणत्या कंपन्यांना भेट दिली आणि या भेटीचा खर्च कोणी केला, याचीही चौकशी व्हावी. तसेच संबधीत अधिकारी व सदस्य यांनी अहवाल सादर केला होता काय ? केला असल्यास त्याची प्रत जोडावी. | शिक्षण मंडळ सदस्यांनी व अधिका-यांनी रिड अँड टेलर्स या नामांकित कंपनीच्या निमंत्रणावरून कंपनीच्या खर्चाने कापडाचे दर्जाची खात्री करणेसाठी भेट दिली हे खरे आहे. प्रत्यक्षात बॉम्बे डाईंग व रेमंड या कंपन्यांनीही तशी निमंत्रणे शिक्षण मंडळाला पाठविलेली होती. मात्र वेळेअभावी या कंपन्यांना भेट देता आलेली नाही. संबंधित पदाधिकारी व अधिकारी दोघेही सक्षम प्राधिकारी असल्याने केवळ खात्री पटविण्यात आलेली आहे. त्यामुळे अहवाल सादर करण्याचा प्रश्न निर्माण होत नाही. | शिक्षण मंडळाच्या ज्या सदस्यांनी व अधिकाऱ्यांनी रेड ॲन्ड टेलरच्या या कंपनीच्या निमंत्रणावरुन कंपनीला भेट दिली. त्यांची नावे जाहिर होणे व रेड ॲन्ड टेलर व इतर कंपन्या आणि शिक्षण मंडळादरम्यानचा भेटीसंदर्भातील पत्रव्यवहार रेकॉर्डवर घेणे आवश्यक आहे. अशा भेटी म्हणजे संबंधित कंपन्याकडून दिलेले आमीष असे मानण्यात येते.या भेटींचे आमीष कोणि कोणि स्वीकारले हे सर्वांसमोर येणे आवश्यक आहे.. | **संबंधित अधिकारी कापडाचा दर्जा ठरविणेस सक्षम असतील तर कंपन्यांना भेट देण्यास हरकत नाही. दर्जाची खात्री करण्यासाठीचे पुरेसे तांत्रिक ज्ञान शिक्षण प्रमुख व शिक्षण मंडळ अध्यक्ष यांना आहे किंवा कसे याबाबत खुलाश्यामध्ये स्पष्टता नाही. तसेच त्या कापडाच्या गुणवत्तेची पडताळणी प्रयोगशाळेत होणार आहे, त्याचा दर्जा अतांत्रिक व्यक्तिंनी तपासणेचे नेमके प्रयोजन काय या बाबतही बोध होत नाही. तसेच एकाच कंपनीस भेट देणेचे प्रयोजनही स्पष्ट होत नाही.** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २७ | तुषार, महालक्ष्मी व प्रेस्टीज हे एकाच मालकाचे असल्याचे पिंपरी–चिचंवडच्या लेखापरीक्षण अहवालात (२००८) नमूद केलेले आहे. त्यावेळेस श्री तांबे हेच अधिकारी असताना घडलेले आहे.सबब प्रस्तुत बाब शिक्षण मंडळाच्या निर्दशनास आणली का? | तुषार ड्रेसेस, महालक्ष्मी ड्रेसेस व पेस्टीज गारमेंटँस या संस्थांनी पिंपरी चिंचवड मनपा शिक्षण मंडळात पुरविलेल्या गणवेशाबाबत कोणतीही तक्रार आलेली नाही व जे लेखापरिक्षणातील अहवालात नमूद मुद्दयांचे निरीस्तीकरण झालेले आहे. त्यामुळे येथील या गणवेश प्रकरणी शिक्षण मंडळ पुणे येथे तत्सबंधी माहिती दडवून ठेवण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. | पिंपरी चिंचवडच्या लेखा परिक्षणाचा अहवाल निरस्त झालेले नाहीत. तसेच श्री.तांबे हेच पिंपरी चिंचवड मधील गैरव्यवहाराला जबाबदार असल्याने त्यांना तुषार ड्रेसेस, महालक्ष्मी ड्रेसेस व प्रेस्टीज गारमेंटस या संस्था चांगल्या परिचयाच्या होत्या. त्यामुळे त्यांनी संबधित कंपन्यांचे पिंपरी चिंचवड मधील गैर व्यवहार लपवून ठेवले. | **प्रस्तुत लेखापरिक्षण अहवाल श्री विजय कुंभार यांनी सादर केला. त्यामधील पृष्ठ क्र. १६ वरील तक्रारीत नमुद केलेला आक्षेप दिसून येतो. त्याचे निरस्तीकरण झाल्याचे शिक्षण प्रमुख यांनी नमूद केलेले आहे. तथापि यासंदर्भात त्यांनी कागदपत्रे उपलब्ध करून दिलेली नाहीत.** |
| २८ | मंजूर झालेल्यांची बँक स्वॉलव्हन्सी सर्टीफीकेट सादर करावे. | माहितीच्या अधिकारात तशी कागदपत्रांची मागणी झाल्यास छायांकीत प्रती उपलब्ध करून देण्यात येतील | आम्ही प्रश्न चौकशी अधिका–यांना विचारले आहेत त्यामुळे त्यांनी चौकशी अधिका–यांना माहिती घेण्यास सांगीतले आहे की आणखी कोणास याचा बोध होत नाही. शिक्षण मंडळाने चौकशी अधिकाऱ्यांना माहितीच्या अधिकारात कागदपत्र उपलब्ध करुन घेण्यास सांगीतले असेल तर त्याचा निर्णय चौकशी अधिकाऱ्यांनी स्वत: घ्यावा. उत्तर देणा–यांनी माहितीच्या अधिकाराची पूर्णपणे माहिती करुन घेण्याची आवश्कता आहे. वस्तू:ता निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर म्हणजे काम कोणास द्यावयाचे ठरल्यानंतर ती सर्व कागदपत्रे माहिती अधिकारातील कलम ४ अन्वये स्वत:हून घोषित करणे आवश्यक होते.निविदा प्रक्रिया पारदर्शक असेल तर या बाबी लपविण्याचे कारण काय?. खरेतर एका निविदाधारकाची बँक सॉल्वन्सीची मुदत निविदा प्रक्रिया सुरु असतानाच संपली होती तरी त्यांची निविदा ग्राह्य धरण्यात आली त्यामुळेच हे का गद समोर आणण्यचे टाळले जात आहे. | **मंजूर झालेल्या निविदाधारकांचे बँक सॉल्व्हन्सी सर्टिफिकेट त्या त्या प्रकरणी सामाविष्ट आहेत. तथापि पाटी खरेदीच्या निवेदेसंबंधी मान्य केलेल्या निविदाधारकाचे सॉल्व्हन्सी सर्टिफिकेटची मुदत निविदा प्रक्रिया चालू असतानाच संपलेली आहे.** |
| २९ | मंजूर झालेल्यांची एस.एस.आय.सादर करावे./ पडताळणी केली का ? | माहितीच्या अधिकारात तशी कागदपत्रांची मागणी झाल्यास छायांकीत प्रती उपलब्ध करून देण्यात येतील | १. प्रश्नाचे उत्तर दिलेले नाही. आम्ही प्रश्न चौकशी अधिका–यांना विचारले आहेत त्यामुळे त्यांनी चौकशी अधिका–यांना माहिती घेण्यास सांगीतले आहे की आणखी कोणास याचा बोध होत नाही. शिक्षण मंडळाने चौकशी अधिकाऱ्यांना माहितीच्या अधिकारात कागदपत्र उपलब्ध करुन घेण्यास सांगीतले असेल तर त्याचा निर्णय चौकशी अधिकाऱ्यांनी स्वत: घ्यावा. उत्तर देणा–यांनी माहितीच्या अधिकाराची पूर्णपणे माहिती करुन घेण्याची आवश्कता आहे. वस्तू:ता निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर म्हणजे काम कोणास द्यावयाचे ठरल्यानंतर ती सर्व कागदपत्रे माहिती अधिकारातील कलम ४ अन्वये स्वत:हून घोषित करणे आवश्यक होते.निविदा प्रक्रिया पारदर्शक असेल तर या बाबी लपविण्याचे कारण काय?. | **मंजूर झालेल्या निविदाधारकांपैकी लिबर्टी शूज व तुषार ड्रेसर्स ॲण्ड टेलरींग फर्म यांचेव्यतिरिक्त बाकी कोणाचेही एस.एस.आय. सर्टिफिकेट तपासणेत आले नसल्याचे आढळते.** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३० | लिबर्टी एस.एस.आय. आहे का ? त्यांना अनामत रक्कमेत सुट देण्यात आली आहे का किंवा कसे ? | लिबर्टी प्रा.लि. हरियाना यांना ही शूज कंपनी एसएसआय युनिट आहे. त्यामुळे त्यांना अनामत रकमेत सुट देण्यात आलेली आहे. | चौकशीच्या वेळी लिबर्टी ही एस.एस.आय असल्याचा कोणताही पुरावा शिक्षण मंडळ सादर करू शकलेले नाहीत.लघुउद्योगांना अनामत रकमे मध्ये सवलत असते.व सदर सवलत फक्त महाराष्ट्रातील लघुउद्योगांना लागू असते .लिबर्टी लघुउद्योग नसल्याने त्यांच्या कडून एकूण निविदा रकमेच्या ५% म्हणजे सुमारे दहा लाख रुपये अनामत घेणे आवश्यक होते त्याऐवजी फक्त पन्नास हजार रुपये अनामत घेण्यात आली हा निर्णय कोणि आणि कोणत्या बैठकीत घेतला त्याचा खुलासा झालेला नाही. | **उद्योग मंत्रालय भारत सरकार यांचे लिबर्टी शूज लि. लिबर्टी पुरम, हरियाणा यांना अग्रेषित पत्र दि. १४.०९.२००५ संबंधित नस्तीमध्ये दिसून येते. त्यापत्राद्वारे लिबर्टी शूज लि. या कंपनीस एसएसआय साठी राखीव असलेले आयटेम्स वगळून अन्य वस्तू उत्पादित करणेची परवानगी दिलेली दिसते. या पत्राच्या आधारे लिबर्टीस एसएसआय ठरवणे हे वस्तुस्थितीच्या पुर्णत: उलट आहे.** |
| ३१ | वर्क ऑर्डर मध्ये ब्रँडनेमचा उल्लेख नाही/ स्पेसीफिक्रेशन करारनाम्यात उल्लेख केलेला आहे का? | वर्क ऑर्डर मध्ये कंपनीच्या नावाचा उल्लेख करण्यात आलेला नाही. परंतु करारनाम्यात स्पेसिफिक्रेशन प्रमाणे साहित्य पुरविणेबाबत उल्लेख केलेला आहे. | वर्क ऑर्डर व करारनाम्यात ब्रँडनेमचा उल्लेख नाही.त्यामुळे कोणत्याही कंपनीच्या कापडाचे गणवेश व बाजारातील कोणत्याही बूट वाटपाचा मार्ग संबधित कंपन्यांना मोकळा झाला आहे किंवा करून दिला आहे. गणवेश आणि बूटांचे स्पेसीफिकेशन नापास झाले आहे. | **वास्तविक मान्य केलेल्या टेंडर प्रमाणे वर्कऑर्डर मध्ये सर्व बाबींचा स्पष्ट उल्लेख असणे अपेक्षित आहे.** |
| ३२ | पिंपरी चिंचवडचा लेखा परीक्षणाचा अहवाल रेकॉर्डवर घेण्यात यावा. | पिंपरी चिंचवड मधील लेखा परिक्षा अहवाल रेकॅार्डवर घेण्यास हरकत नाही. | ...... | – |
| ३३ | पाकीट क्रमांक १ उघडल्यानंतर sample testing मध्ये [supt.] नापास झाल्यानंतर त्यांची पाकीट ब का उघडण्यात आले आहे ? | सुपरिटेंडेंट या प्रयोगशाळेतून नापास झालेल्या कापडाच्या नमुन्यांचे ठेकेदारांचे पाकीट क्र.२ उघडण्याचा निर्णय शिक्षण मंडळ यांनी दिनांक २१.७.२००८ चे सभेत मुंबई प्राथमिक शि.नियम १९४९ चे ५६ ड नुसार व दोन जानेवारी.१९९९२ चे नियम ८–४ प्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली आहे. | नमूने नापास झाल्यानंतर 'ब' पाकीत उघडू नये असा नियम आहे त्यामुळे शिक्षण मंडळाची कार्यवाही बेकायदा ठरते | **या निर्णयाची कारणमिमांसा स्पष्ट करणेत आलेली नाही.** |
| ३४ | टेंडर निघताना नंबरर्स दिले होते काय ? व त्याच नंबरचे परत प्राप्त झाले काय ? | निविदा वितरीत करताना निविदादारांना क्रमांक देण्यात येतात व त्यानुसार स्वीकारले जातात. | .......... | – |
| ३५ | पाकीट ब च्या शिक्यांचा रंग का बदललेला आहे ? | फॅार्म विक्रीच्या वेळी कार्यालयात त्या त्यावेळी उपलब्ध असलेल्या त्या–त्या इंक पॅडचे शाईनुसार शिक्यांचे शाईचा रंग बदलला गेला आहे. | उत्तर समाधानकारक नाही, फक्त ज्या निविदा धारकांच्या निविदा मंजूर झाल्या आहेत त्यांच्याच निविदाच्या शिक्यांचा रंग वेग़ळा कसा? नियमाप्रमाणे निविदा ठेकेदारांच्या उपस्थीतीत उघडली असती तर ही शंका घ्यायला वाव उरला नसता. चौकशी समिती समोर ठेकेदारांनी आरोप केले होते की, ज्यांना काम मिळाले आहे त्यांच्याच 'ब' पाकीटातील दरपत्रकावर इतरांपेक्षा वेगळ्या आणि एकाच रंगाचे शिक्के आढळुन येतात. त्यामुळे 'ब' पाकीट फोडल्यानंतर बदलल्याची दाट शक्यता वाटते. | **१. बूट मोजे खरेदीसंबंधी लिबर्टी करीता निळा व इतरांकरीता काळा रंगाचा शिक्का वापरला आहे.**<br>**२. गणवेश खरेदीसंबंधी झिल एन्टरप्रायझेस यांचे करीता काळा व इतरांना निळा शिक्का वापरल्याचे आढळते तथापि बहतांश काम हे तुषार ड्रेसर्स अॅण्ड टेलरींग फर्म यांना देणेत आलेले आहे.**<br>**३. विद्यानिकेतन विद्यार्थी साहित्य –** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | गणेश ट्रेडर्स यांना निळा रंगाचा शिक्का व इतरांना काळ्या रंगाचा शिक्का वापरला आहे.<br>४. विद्यानिकेतन विद्यार्थी ड्रॉईंग साहित्य – गणेश ट्रेडर्स यांना निळा रंगाचा शिक्का व इतरांना काळ्या रंगाचा शिक्का वापरला आहे.<br>५. पाटी खरेदी – दोन्हीही पात्र निविदाधारकांना काळा शिक्का वापरला आहे.<br>६. इंग्रजी माध्यम गणवेश – पात्र ५ पैकी ३ वर काळा व २ वर निळा शिक्का आहे.<br>७. शालेय स्वछता साहित्य – गणेश ट्रेडर्स यांना निळा रंगाचा शिक्का व इतरांना काळ्या रंगाचा शिक्का वापरला आहे. तथापि पुर्वा ट्रेडिंग कंपनी यांची शिफारस केलेली आहे.<br>८. विद्यानिकेतन बूट मोजे – लिबर्टी करीता काळा व इतरांकरीता निळा रंगाचा शिक्का वापरला आहे.<br>९. वह्या खरेदी – गणेश ट्रेडर्स यांना निळा रंगाचा शिक्का व इतरांना काळ्या रंगाचा शिक्का वापरला आहे.<br>१०. बालवाडी विद्यार्थी गणवेश – नयन युनिफॉर्म्स यांचेकरीता निळा व इतरांकरीता काळा शिक्का वापरला आहे.<br>११. विद्यानिकेतन विद्यार्थी गणवेश – प्रेस्टीज गारमेंट यांचे करीता निळा व इतरांना काळा शिक्का वापरला आहे. तथापि त्यांची शिफारस |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | **केलेली नाही.**<br>**१२. इंग्रजी माध्यम खरेदी – गणेश ट्रेडर्स यांना निळा रंगाचा शिक्का व इतरांना काळ्या रंगाचा शिक्का वापरला आहे. परंतु काम तिघांना मिळालेले आहे.**<br>**१३. विद्यानिकेतन विद्यार्थी बनियन व विद्यार्थिनी पेटीकोट खरेदी – गणेश ट्रेडर्स यांना निळा रंगाचा शिक्का व इतरांना काळ्या रंगाचा शिक्का वापरला आहे.**<br>**अशाप्रकारे वेगवेगळे शिक्के वापरणेचे प्रयोजन समजून येत नाही.** |
| ३६ | पाकीट ब फोडताना आंम्हास बोलावले नाही. पाकीट चेंज करण्याचा संशय असल्याने खात्याने या बाबत अभिप्राय दयावा. | पाकीट क्र.२ फोडताना शिक्षण मंडळाने अचानक निर्णय घेवून मुंबई पा.शिक्षण नियम १९४९ मधील ५६ ड नुसार शिक्षण मंडळाचे दि.२१.७.२००८ चे सभेत कार्यवाही केली आहे. | सदर कार्यवाही बेकायदा आहे | **टेंडर प्रक्रिया पारदर्शक होणेच्या दृष्टीने किमान सर्व पात्र व्यक्तिंना बोलावणे अभिप्रेत आहे.** |
| ३७ | राष्ट्रीय मजदूर मध्यवर्ती ग्राहक संघ यांची निविदा अपुर्ण ठरविण्याचे कारण काय ? | शॉप ॲक्ट मध्ये कामाचे स्वरूप नाही व डी.डी. बँकेत पास झाला नाही तसेच विकास आयुक्त, उद्योग व भांडार यांचेकडे अधिकृत पुरवठाधारकाची नोंदणी केलेली नाही. | ............. | – |
| ३८ | फॉरमॅट मध्ये ऑथोराईजड लेटर नसताना इतरांना प्रमाणे श्री माहेश्वरी यांना पुर्नसादर करण्याची संधी का दिली नाही ? | याबाबत शिक्षण मंडळाने दोन जानेवारी,१९९२ चा नियम ८/४ व मुंबई प्राथ.शि. नियम १९४९ मधील ५६ ड नुसार निर्णय घेतल्याने तशी संधी दिली गेलेली नाही. | शिक्षण मंडळाचे धोरण याबाबतीत प्रत्येक निविदा धारकांच्या बाबतीत वेगळे दिसते. | **सर्वांना एकाच प्रकारची सवलत दिलेली दिसत नाही. काही निविदाधारकांकडून नंतर पूर्तता करून घेतल्याचे दिसून येते.** |
| ३९ | पात्र निविदा धारकांचे ब पाकीट सर्वांसमक्ष सील करून कस्टटीत ठेवणे अपेक्षित आहे. तसे का करण्यात आले नाही ? लिफाफेबदलण्याची शक्यता आहे काय ? | पात्र निविदा धारकांचे पाकीट क्र.२ सर्वांसमक्ष सील करूनच कस्टडीत ठेवण्यात आलेले होते. | उत्तर धादांत खोटे आहे . असे पाकीट आपण सील करून ठेवले नसल्याचे तांबे यांनी कबूल केले होते. | **अशाप्रकारची कार्यवाही केल्याचे शिक्षण प्रमुखांनी नमुद केलेले आहे. परंतु सर्व लिफाफे एकत्र करून त्याचा केलेला एक सीलबंद लखोटा प्रकरणात आढळून येत नाही.** |
| ४० | १९९२ चा जी.आर. सोईस्कर रित्या घेतलेला आढळतो. या बाबत खुलासा दयावा. | शिक्षण मंडळाचे सर्व कामकाज मुंबई प्रा.शिक्षण अधिनियम १९४७ व नियम १९४९ नुसार चालते. या नियमांमध्ये वित्तीय नियमांचा उल्लेख नाही, अशा आवश्यक वेळी दोन जानेवारी,१९९२ च्या शासन निर्णयाचा आधार घेण्यात येतो. | मुंबई प्रा.शिक्षण अधिनियम १९४७ व नियम १९४९ मध्येच निविदांच्या बाबतीत राज्य शासनाने वेळेवेळी केलेले नियम शिक्षण मंडळाला लागू असतील असे म्हटले आहे | – |
| ४१ | १८० पानी चाररेखी बाऊंड वही सुदर्शन जम्बो डिलक्स वह्या करीता गणेश टेडर्स, पुणे यांचे वेगवेगळे दर का मान्य केले गेले? जावक | विद्यानिकेतन व नियमीत शाळांसाठी एकाच पुरवठा धारकांकडून पुरविण्यात येणा–या वहयांची निविदा स्वतंत्र असल्याने त्यांचे दरही त्यांनी त्याच पध्दतीने नोंदविलेले होते. त्यामुळे या बाबतची | संबधितांकडून म्हणजे कोणा कडून? या प्रश्नाचा खुलासा केलेला नाही.<br>एकाच पुरवठादाराने एकाच प्रकारच्या वह्यांची निविदा | **शिक्षण मंडळाचा खुलासा अपूर्ण आहे.** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | क्रमांक भांडार १४२८ दिनांक ९/७/२००८ व कार्यपत्रिका क्रमांक ३ विषय क्रमांक ३८ ठराव क्रमांक ३८ दिनांक २३/६/२००८ खुलासा करावा. | कारणमिमांसा संबंधितांकडून वदवून घेणे योग्य होईल. | वेगवेगळ्या दराने भरुनही वेगवेगळे दर कसे मंजुर झाले याचा कोणताही खुलासा नाही. | |
| ४२ | सध्या वाटप झालेल्या वस्तुंच्या दराबाबत चालू बाजार भावाशी क्रॉस चेकींग करणे व जर डिफरन्स आढळला तर कोणाकडून वसुली करावी. | त्या त्या दर्जाच्या वस्तूंच्या दरांची बाजारात व कंपनी दरानुसार खात्री केलेली होती. त्यानुसार पास झालेले दर हे वॅट, वाहतूक, चढउतार, शाळा पोहोच, आयकर व संबंधितांचा एजन्सी चार पानी रंगीत छपाई इत्यादी बाबी समाविष्ट करून दर मागविण्यात आल्याने एकूण किंमत एम आर पी पेक्षा जास्त आलेली आहे. | प्रश्नाचे उत्तर दिलेले नाही. | **शिक्षण मंडळाने खुलासा दिला आहे. परंतु त्यात नमुद बाबींपुढे बाजारदरापेक्षा नेमका किती जास्त दर देणे संयुक्तिक आहे याचे दरपृथ:करण केले नाही.** |
| ४३ | सुदर्शनच्या दर पत्रकात श्री राजेश नहार व श्री विजय कुंभार यांनी सादर केलेल्या दरपत्रकानुसार ११.५० पैसे व १२/– रूपये असताना मंडळाने १९.९३ रुपयास वह्या खरेदी करण्यामागील कारण काय ? | श्री.राजेश नहार व श्री. विजय कुंभार या तक्रारदारांनी चौकशीच्या वेळी सादर केलेल्या सुदर्शन कंपनीच्या वहयांच्या दरपत्रकातील दर हे निविदेतील स्पेसिफिकेशनमधील वहयांचे नसून त्यापेक्षा निकृष्ठ दर्जाचे परंतू सुदर्शन कंपन्याचे असल्याने या दरात तफावत आढळून येते. | आम्ही दिलेल्या दरपत्रकासंदर्भात शिक्षण मंडळाने कोणाकडून अहवाल मागविला त्या अहवालाची प्रत द्यावी.<br>सदरहू दरपत्रकातील दर निकृष्ठ दर्जाच्या वह्यांचे असल्याचे दरपत्रकावरुन कसे ठरविले याचा खुलासा नाही. | – |
| ४४ | श्री वेलनकर यांनी ग्राहक पेठेच्या वतीने १८ रूपये पाटीची किंमत असल्याचे नमूद केले आहे सबब जादा दराने पाटया खरेदी बाबत मंडळाचा उद्देश काय ? | श्री वेलनकर यांनी केलेल्या स्पेसिफिकेशनच्या पाटीचे दर विदीत केलेले आहेत. याबाबत कोणतीही खात्री पटविलेली नाही. शिक्षण मंडळाने खरेदी केलेल्या विद्यार्थी पाटया–स्लेट या के डी राजदूत कंपनीच्या असून सदरचे दर हे आयकर, वॅट, वाहतूक, चढउतार, तुट व नुकसान फायदा यासह दर आलेले आहेत. त्यामुळे जादा दराने खरेदी झालेली नाही. | शिक्षण मंडळाचे हे उत्तर दिशाभूल करणारे आहे. मंडळाचे पैसे वाचविण्यापेक्षा निविदाधारकांना जास्त पैसे कसे मीळतील याचा विचार शिक्षण मंडळाने केलेला दिसतो. पाटी, पेंसील, वही वगैरे सर्व गोष्टींची बाजारातील किंमत आजही तपासून पाहणे शक्य आहे. वाहतुक, वाटप, चढउतार व वॅट यामुळे किंमतीत १०% पेक्षा जास्त फरक पडू शकत नाही. त्यामुळे या वस्तू एमआरपी पेक्षा कमीत कमी २०% ते ३०% स्वस्त मिळणे आवश्यक आहे. | **गुणवत्तेमुळे दरामध्ये नेमकी किती वाढ असणे अपेक्षित आहे याचे दर पृथ:करण शिक्षण मंडळाने दिले नाही.** |
| ४५ | सुदर्शन कंपनीचे ऑथराईज्ड लेटरच्या तारखा ह्या निविदापुर्वीच्या आढळतात ? व सर्वांचे पत्रावर ह्या ठेकेदारांशिवाय कोणासाठी ऑथराईजेशन दिले नाही असे नमूद केलेले आहे. त्यामुळे सर्वात शेवटी सुदर्शनने दिलेल्या संस्थेस पात्रता लाभते व इतर सर्व डिसक्लालिफाय (अपात्र) होतात असे तक्रारदाराचे म्हणणे आहे या बाबत अभिप्राय नोंदवावा. | सुदर्शन कंपनीने त्यांचे अधिकृत पुरवठादार यांनी या कार्यालयास ३१ मे २००८ चे पत्राने कळविलेले असून त्यांनी निविदा प्रसिध्दीपूर्वीचे अधिकारपत्र निविदेसोबत जोडलेली आहेत. याबाबत शिक्षण मंडळाने नामांकित कंपनीचे अधिकृत पत्र असल्याने शंका घेतलेली नाही. अधिकारपत्रातील आशयाचा ध्वन्यार्थ हा त्या त्या पुरवठा दारांच्या संदर्भात लागू आहे. | शिक्षण मंडळाने शंका घेतली नाही कारण त्याच कंपनीला निविदा देण्याचे निविदा जाहिरात देण्या पूर्वीच ठरले असावे तसे नसते तर आणखी काही प्राधिकारपत्रे आल्या नंतरही शंका व्यक्त केली असती. प्राधिकार पत्रांचा ध्वन्यार्थ कोणि लावला तेही सर्वांसमोर आले पाहिजे, सर्वात शेवटचे प्राधिकार पत्र ग्राह्य धरून बाकीच्यांच्या निविदा अपात्र ठरविणे नियमानुसार योग्य झाले असते.परंतू नियम ,पारदर्शकता आणि सचोटी याचे पालन झाल्याचे संपूर्ण निविदा प्रक्रियेमध्ये कुठेही दिसून येत नाही. | **शिक्षण मंडळाचा खुलासा सकृतदर्शनी स्विकार्हार्य आहे. परंतु ही सवलत अन्य अपात्र निविदाधारकांना दिली नसून त्यांना थेट अपात्र ठरविले आहे.** |
| ४६ | वह्यांच्या निविदेप्रमाणे इतर वस्तुंच्या निविदेकरीता ऑथराईजेशन लेटरचा फॉरमॅट सेम आहे काय ? | होय. | शेवटचे प्राधिकार पत्र ग्राह्य धरणे हाच निकष सर्व निविदा धारकांना लावणे कायद्यानुसार आवश्यक होते. | – |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४७ | एच.पी.सी.चा ऑथराईजड डिलर असताना श्री राजेश पेपर प्रॉडक्ट यांची निविदा अपात्र का ठरविण्यात आली?– नहार | एच पी सी कंपनी कागद पुरवते, मात्र शिक्षण मंडळाची निविदा वहया पुरविणेची होती. श्री नहार यांच्या वहया निविदा नोटीसमध्ये नमूद ब्रॅण्डेमध्ये समाविष्ट नव्हती. त्यामुळे पाकीट क्र.१ उघडलेनंतर शिक्षण मंडळाने अपात्र ठरविलेले आहे. | वह्यांचा नमुना प्रयोगशाळेत तपासताना तो कागद एच.पी.सी कंपनीचा आहे की नाही याची तपासणीच झालेली नाही. | **शिक्षण मंडळाने खुलासा केला आहे.** |
| ४८ | निविदा काढल्यानंतर प्रतिभा क्लासमेट, नवनीत यांचे नावाची शुध्दीपत्रकात नोंद घेण्यामागील कारणे काय? तसेच शुध्दीपत्रकानंतर निविदाफॉर्ममध्ये बदल का करण्यात आला नाही ? | स्पर्धा होण्यासाठी सुदर्शन शिवाय नवनित, प्रतिभा, क्लासमेट या नामांकित कंपन्याचे शुध्दीपत्रामध्ये समावेश करण्यात आला आहे. परंतु शुध्दीपत्रानुसार फॅर्म वितरीत करताना संबंधिताना स्पष्ट कल्पना देण्यात आलेली आहे. | हा निर्णय कोणि व कोणत्या बैठकीत घेतला?<br>शिवाय कंपन्यांचे नाव लावून निविदा प्रसिध्द करता येत नाही. | **शिक्षण मंडळाने निर्णय घेतल्याचे शिक्षण प्रमुखांनी सांगितले आहे. परंतु त्यानुसार फॉर्म मध्ये योग्य त्या दुरूस्त्या का केल्या गेल्या नाहीत, याबाबत खुलासा केलेला नाही.** |
| ४९ | ब पाकीट उघडल्यानंतर एल. वनच्या दरात – तुषारच्या दरात जील इंटरप्रायजेसला ऑ फर का देण्यात आली नाही ? जेणे करून अपेक्षित गुणवत्तेचा माल न्युनतम दरात देणे शक्य झाले असते? | या प्रश्नाचे उत्तर प्रश्न क्रमांक २३ मध्ये नमूद असून जील कंपनीलाही न्यूनतम दराने अंशत: काम देण्यात आलेले आहे. | हा प्रश्न गणवेशांच्या बाबतीत आहे तर प्रश्न क्र. २३ बुटांच्या बाबतीत आहे.खरे तर एकाच कंपनीच्या निविदा पास झाल्याने नापासांना स्पर्धेमध्ये आणण्यापेक्षा फेर निविदा मागविणे कायद्यानुसार आवश्यक होते. | **एकूण १४ आयटेमपैकी केवळ एक आयटेम झिल एन्टरप्रायझेस यांना देण्यात आला आहे.** |
| ५० | ३०/५/२००८ ते ५/६/२००८ पर्यत निविदा फॉर्म का देण्यात आले नाही ? | दि. ३०.५.२०० ८ पासून फॅर्म उपलब्ध होते. मात्र फॅर्म घेण्यासाठी पुरवठादार आले नाहीत. | ....... | – |
| ५१ | दिनांक ५/६/२००८ ते ७/०६/२००८ मध्ये फॅर्म विकणे चालू होते नंतर ११ /६/ २००८ पर्यंत मूदत वाढविलेली आढळते.सदरची निविदा दिनांक १३/०६/२००८ रोजी उघ्दडण्याचे प्रयोजन काय ? | फॅर्म विक्रीची मूदत ११.६.०८ पर्यंत वाढविण्यात आलेली होती व स्वीकारण्याची मूदतही १३.६.०८ पर्यंत वाढविण्यात आली होती. या बाबत मंडळाने के लेल्या नियोजनानुसार व घेतलेल्या निर्णयानूसार कार्यवाही करण्यात आलेली आहे. | मंडळाने हा निर्णय कोणत्या बैठकित घेतला हे चौकशी अधिका–यांसमोर कुठेही आलेले नाही. | – |
| ५२ | निविदा मागणी मागविणे करीता ३ आठवड्यांची मूदत दिली होती का ? | नाही.(विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व सुविधा वेळेत मिळण्याकरिता १४ दिवसांची निविदा मागविलेली होती.) | शिक्षण मडळाच्या कृतीवरून वेळेत शालेय साहित्य मिळवण्यासाठी प्रयत्न केल्याचे कुठेही दिसून येत नाही. तसे असते तर अ पाकिट उघडल्यानंतर वर्क ऑर्डर देइपर्यंतचा म्हणजे ४७ दिवसांपेक्षा जास्त कालावधी वाया घालवला नसता | – |
| ५३ | वह्या खरेदी निविदे बाबत स्क्रुटीनी सिट कोणी बनविले आहे | या कार्यालयातील भांडारपालांनी बनविलेली आहे. | हाताने लिहिलेल्या व छापलेल्या स्क्रुटीनी शिट मध्ये तफावत आहे हे चौकशीच्या वेळी सिद्ध झाले आहे. त्यात काही निविदा धारक पात्र असतानाही त्यांना अपात्र ठरविण्यासाठी प्रयत्न केले गेल्याचे दिसते. | **तफावत असल्याचे आढळून येते विशेषत: समर्थ को.ऑप. कन्झ्युमर ची सॉल्व्हन्सी करीता हस्तलिखीत तक्त्यात २५ लाख असे नमूद केले आहे, तथापि टायपिंग केलेल्या तक्त्यात ३५ व १५ लाखाचा प्रॉब्लेम असे नमूद केलेले आहे.** |
| ५४ | समथे कॉ. ऑप. यांची निविदा रद्द करण्यामागील कारणे काय ? | १. बयाणा रक्कम भरलेली नाही.<br>२.बॅक सॉलव्हन्सी एकवट नाही. (३५ अधिक १५ लक्ष– वेगवेगळ्या तारखांची बँक पतदर्शक प्रमाणपत्र जोडलेले आहेत.)<br>३. टेंडर अटीमध्ये पुरवठादाराचे नाव व पत्ता समर्थ कॉ.ऑप. कंझ्यु. | ........ | – |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | सेंट्रल्स लि.शंकर मंदिर, सावरकर रस्त्याजवळ,ठाणे असा आहे. प्रत्यक्षात शॉप ॲक्टवर असलेला पत्ता डॉ. चिपकर्स बिल्डींग कार्नर, नवपाडा ठाणे असा आहे.<br>४. समर्थ कॉ.ऑप. कंझ्यु. सेंट्रल्स लि.ची संचालक मंडळाची कोणतीही यादी अथवा टेंडर फॉर्मवर सह्या करणाऱ्या अधिकारासाठी डायरेक्टर बोर्डाचे अधिकार पत्र जोडले नाही. | | |
| ५५ | स्क्रुटीनी शिटमध्ये समर्थ करीता टन ओव्हर व कामाचा अनुभव दाखला असताना स्क्रुटीनी शिट मध्ये नाही म्हणून लिहले आहे .सबब त्यांनी एकच सॅम्पल टेस्टींगचे पैसे भरले असताना त्यांचे तीन पैकी एक सॅम्पल लॅब टेस्टीगला का पाठविण्यात आले नाही? टेस्टींगला का पाठविण्यात आले नाही या बाबत खुलासा करावा. | १. बयाणा रक्कम भरलेली नाही.<br>२.बॅक सॉलव्हन्सी एकवट नाही. (३५ अधिक १५ लक्ष– वेगवेगळ्या तारखांची बॅंक पतदर्शक प्रमाणपत्र जोडलेले आहेत.)<br>३. टेंडर अटीमध्ये पुरवठादाराचे नाव व पत्ता समर्थ कॉ.ऑप. कंझ्यु. सेंट्रल्स लि.शंकर मंदिर, सावरकर रस्त्याजवळ,ठाणे असा आहे. प्रत्यक्षात शॉप ॲक्टवर असलेला पत्ता डॉ. चिपकर्स बिल्डींग कार्नर, नवपाडा ठाणे असा आहे.<br>४. समर्थ कॉ.ऑप. कंझ्यु. सेंट्रल्स लि.ची संचालक मंडळाची कोणतीही यादी अथवा टेंडर फॉर्मवर सह्या करणाऱ्या अधिकारासाठी डायरेक्टर बोर्डाचे अधिकार पत्र जोडले नाही. | ....... | **दोन छानणी तक्ते सलग सलग पृष्ठ क्र. ६२१ व पृष्ठ क्र ६२२ वर सामाविष्ट असून त्यामध्ये तफावत आहे.** |
| ५६ | राईटस ही लोंखड व पोलाद टेस्टींग लॅब आहे. त्यांचे कडे रबर/ पी.व्ही.सी बुट टेस्टींगला पाठविण्याचा निर्णय कोणाचा आहे ? | राईट्स मुंबई ही शासन मान्य प्रयोग शाळेत १९९२ च्या शासन निर्णयानुसार शिक्षण मंडळाने बूट मोजे तपासणीसाठी पाठविलेले होते. त्यांनी त्याचा तपासणी अहवाल पाठविलेला आहे. | १९९२ च्या शासन निर्णयात राइटस कंपनीला बूट तपासण्याची परवानगी असल्याचे दिसत नाही नंतर त्यांना शासनाने परवानगी दिली असल्यास त्याचा पुरावा सादर करण्यास श्री. तांबे यांना सांगण्यात आले होते.परंतू तसा पुरावा त्यांनी सादर केलेला नाही | **ज्या संस्थांना जी साहित्ये तपासणेचे अधिकार सुपूर्त केलेले आहेत त्याची सविस्तर माहिती उक्त शासन निर्णयात आहे. त्याचे अवलोकन केले असता रेल इंडिया टेक्निकल ॲण्ड इकोनॉमिक्स सर्व्हिसेस या कंपनीस केवळ लोखंड व पोलादी वस्तूंचे नमूने तपासणेचे अधिकार असताना त्यांचेकडे रबर व पीव्हीसी व शूज तपासणेत पाठवणेत आलेले आहेत, ही बाब संयुक्तिक वाटत नाही.** |
| ५७ | गणवेश खरेदी बाबत बिडर( निविदाकार) हे सिलाई करण्यात सक्षम आहेत काय ? ह्याची खातरजमा केली आहे का ? | गणवेश खरेदीबाबत शिलाई करण्याचा सक्षमेतेची खातर जमा केलेली आहे. | चौकशी अधिक–यांसमोर तशी कोणतीही खातरजमा केली नसल्याचे श्री.तांबे यांनी कबूल केले होते.तरीही कधी ,कोणि ,कशी आणि काय खातर जमा करून घेतली याचा अहवाल सादर केला असल्यास त्याची प्रत सादर करावी. | **खातरजमा केल्याबाबत तपशिल शिक्षण मडळाने दिलेला नाही.** |
| ५८ | ज्या कागदापत्रांमुळे सनराईजची निविदा रद्द झाली त्याच कारणामुळे पद्मयोग अपात्र होणे आवश्यक आहे परंतू तसे न करता त्यांना मान्यता दिल्याचे आढळते. याबाबत खात्याने अभिप्राय दयावा. | पद्मयोग या निविदाधारकास कामाचा अनुभव आहे. याची खात्री पटलेली आहे. सनराजच्या वह्या ब्रॅन्डेड नसल्यामुळे त्यांचे निविदा पाकीट उघडण्यात आलेले नाही. | ........... | **–** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५९ | दिनांक १८/६/२००८ सुपरीटेंडेंट कंपनी ऑफ इंडिया प्रा.लि. या लॅब कडे नमुने टेस्टसाठी पत्र पाठविण्यात आले. दिनांक ३०/०६/२००८ सुपरीटेंडेंट कंपनी ऑफइंडिया प्रा.लि. यांनी काम करण्यास असमर्थता असल्याचे पत्र सादर केलेले आहे. तत्पुर्वी या कार्यालयाने दुसऱ्यालॅब कडे नमुने टेस्टींग करीता का पाठविले नाही ? | सुपरिटेंडेंट प्रयोगशाळेत प्रत्यक्ष नमुना तपासणीसाठी १८.६.२००८ ला नमुना सादर केला असता त्यांनी तपासणीस असमर्थता दर्शविल्याने २१.६.२००८ च्या पत्राने पुणे येथील खादीग्रामोद्योग महामंडळ (हातकागद यांचेकडून तपासणी करून घेण्यात आली आहे.) | .......... | – |
| ६० | कल्याणी कार्पोरेशन ह्यांचे शॉपअॅक्ट मध्ये फरक असताना त्यांना इतरांप्रमाणे अपात्र का ठरविण्यात आले नाही ? | कल्याणी कॅार्पोरेशन या संस्थेचे डीटीपी ऑफसेट आणि बायडींगचे व्यावसायिक असून त्याची समक्ष खात्री केलेली आहे. त्यांच्या शॉप अॅक्ट मध्ये फरक आढळून आलेला नाही. संबंधित पुरवठादार हा सुदर्शन कंपनीचा ऑथराईजड डिलर आहे. | कल्याणी कॉर्पोरेशनच्या व्यावसायिकाची समक्ष खात्री करण्यासाठी कोण गेले होते?आणि ते वह्या किंवा स्टेशनरीचे सप्लायर आहेत. याची त्यांनी खात्री पटवून दिली म्हणजे नेमके काय केले. ?त्यांच्या शॉप अॅक्टवर फक्त प्रिंटींग असा उल्लेख आहे. शिवाय कोणत्याही कंपनीचे फिल्ड इन्स्पेक्शन केले नसल्याने तांबे यांनी चौकशीच्या वेळी कबूल केले होते. | **समक्ष केलेल्या खात्रीबाबत शिक्षण मंडळाने तपशील सादर केलेला नाही.** |
| ६१ | हातमाग लॅबकडून १८४८– १९९१ जे.एस. प्रमाणे लॅब टेस्टींग न होता फक्त पेपरच्या क्वॉलीटी बाबत टेस्ट का केली गेली सबब त्यांचा रिपोर्ट मान्य करण्यासारखा नसताना त्याअनुषंगाने निविदा मान्य करण्यामागे कारणे काय? | शिक्षण मंडळाने केवळ ५४ जीएसएम पेपरची तपासणी करून घेणे अपेक्षित केलेले होते. | निविदेमध्ये फक्त एच.पी.सी कंपनी च्या कागदाच्या वह्यांचा आग्रह धरला होता मग वहीच्या कागद मागणी प्रमाणे आहे की नाही याची तपासणी का केली गेली नाही. सुदर्शन वर एवढी मेहेरनजर करण्याचे कारण काय? | **टेंडरचे स्वरूप विचारात घेता संपूर्ण वहीची तपासणी करून घेणे अपेक्षित होते.** |
| ६२ | सनराज करिता स्वतंत्र मालक असताना पार्टनर शिप नुसार शॅापअॅक्ट असण्याचे का नमूद केले गेले? व त्यानुसार त्यांना अपात्र ठरविण्यात आल्याचे स्क्रुटीनी सिट मध्ये कोणी नमूद केले व का? | या मुद्दयावर त्यांना अपात्र ठरविण्यात आले नसून ब्रॅन्ड मध्ये त्यांना अपात्र ठरविण्यात आले आहे. | हे उत्तर देखील चूकीचे आहे. सनराज हा 'ब्रँड' नाही हे कशाच्या आधारावर व कोणि ठरवले? | **मूलत: टेंडर नोटीसमध्ये या ब्रॅण्डचा उल्लेख नसल्याने शिक्षण मंडळाने संबंधितांस अपात्र ठरवल्याचे शिक्षण प्रमुख यांनी नमुद केले आहे.** |
| ६३ | जा.क्र.भांडार/२०१६/२००५–०६ दि.२.८.२००८ नुसार समर्थ को. ऑफकंझ्यु. सेंट्रल स्टोअर प्रा.लि. यांची निविदा रद्द करण्यामागील कारणे संयुक्तीक नाहीत.<br>१.शॅापअॅक्ट मधील तफावत आढळते.<br>२. बॅंक सॉल्व्हन्सी २५ लाख नमूद केली<br>३. सॅम्पल टेस्टींग फी पुरेशी नाही अपूरी आहे. पूर्णत: चूकीचे आढळते. खुलासा करावा. | १. बयाणा रक्कम भरलेली नाही.<br>२.बॅंक सॉलव्हन्सी एकवट नाही. (३५ अधिक १५ लक्ष– वेगवेगळ्या तारखांची बॅंक पतदर्शक प्रमाणपत्र जोडलेले आहेत.)<br>३. टेंडर अटीमध्ये पुरवठादाराचे नाव व पत्ता समर्थ कॉ.ऑप. कंझ्यु. सेंट्रल्स लि.शंकर मंदिर, सावरकर रस्त्याजवळ,ठाणे असा आहे. प्रत्यक्षात शॉप अॅक्टवर असलेला पत्ता डॉ. चिपकर्स बिल्डींग कार्नर, नवपाडा ठाणे असा आहे.<br>४. समर्थ कॉ.ऑप. कंझ्यु. सेंट्रल्स लि.ची संचालक मंडळाची कोणतीही यादी अथवा टेंडर फॅार्मवर सह्या करणाऱ्या अधिकारासाठी डायरेक्टर बोर्डाचे अधिकार पत्र जोडले नाही. | ............ | – |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६४ | स्क्रूटीनी सिट मॅन्यूअली बनविणाराचे नाव काय? टाईप केलेल्या व हाताने लिहिलेल्या तक्त्यामध्ये माहितीची तफावत आढळते. खुलासा करावा. श्री.कुंभार यांनी दिलेल्या तक्त्यात ३५ व १५ लाखाचा प्रॉब्लेम लिहिले आहे. तथापि हाताने लिहिलेल्या तक्त्यात २५ लाख नमूद केले आहे. याबाबत खुलासा व्हावा ? | स्क्रुटीनी सिट बनविताना अनावधानाने काही चुका असून भांडारपालांनी –श्रीमती देशमुख यांनी सदर सिट बनविले आहे. मात्र प्रत्यक्ष टायपींगमध्ये दुरूस्ती करण्यात आलेली आहे. | या चुका अनवधानाने राहिलेल्या नाहित तर जाणिवपूर्वक काही निविदा धारकांना अपात्र ठरविण्यासाठी केल्या आहेत.प्रत्यक्षात त्यांची ३५+१५ =५० लाखांची म्हणजे आवश्यक तेवढी बॅंक सॉल्वन्सी दिली असल्याचे दिसते. | **मूळ हस्तलिखीत कागदपत्रामधील दोष टायपिंग करीत असताना दुरूस्त करणे याचा अर्थ टायपिंग करीत असताना पुन्हा मूळ कागदपत्रे पडताळणी केली किंवा कसे याबाबत शिक्षण मंडळाने सविस्तर भाष्य केलेले नाही.** |
| ६५ | निविदा प्रकरणातील प्रत्येकी सहीबरोबर दिनांक का टाकलेली नाही ? खुलासा करावा. | चुकीने दिनांक टाकण्याचे राहून गेलेले आहे. | प्रशासनाचा प्रदीर्घ अनुभव असणा–यांकडून ही चूक अपेक्षीत नाही. तसेच ही चूक नाही तर जाणिवपूर्वक केलेले कृत्य आहे व त्यामागे चौकशी झाल्यास दिशाभूल करणे सोपे जावे हा हेतू आहे. | – |
| ६६ | बूट खरेदी निविदा मध्ये सॅम्पल टेस्टींग फी पेज नं.१ वर ३००० नमूद केलेले आहे व पुढे ४ हजार पर सॅम्पल नमूद केले आहे. दोन्ही मध्ये तफावत का ? तीन सॅम्पल टेस्टींग फी करिता १२ हजार रूपये घेणे आवश्यक आहे का ? खुलासा व्हावा. | बयाणा रक्कम भरली नसल्याने समर्थ कन्झ्यूमर्स को.ऑप सोसायटीची बूटांची निविदा उघडलेली नाही. | प्रश्न आणि उत्तर याचा ताळमेळ नाही.एकाच निविदा संचामध्ये एका ठिकाणी सॅंपल फी ३००० रु.तर दुस–या ठिकाणी ४००० रुपये सॅपल फी असा उल्लेख आहे तो का? व कोणती सॅंपल फी खरी . | **टेंडर संच पाहिले असता ही त्रुटी असल्याचे दिसून येते.** |
| ६७ | समर्थ को. ऑफकंझ्यु. सेट्रल स्टोअर प्रा.लि. यांची निविदा अपुरी सॅम्पल टेस्टींग फी असलेल्या कारणामुळे अपात्र ठरविलेली आहे का ? खुलासा व्हावा. इतरांप्रमाणे त्यांना दुरूस्तीची संधी का दिली नाही. | १. बयाणा रक्कम भरलेली नाही.<br>२.बॅक सॉलव्हन्सी एकवट नाही. (३५ अधिक १५ लक्ष– वेगवेगळ्या तारखांची बॅंक पतदर्शक प्रमाणपत्र जोडलेले आहेत.)<br>३. टेंडर अटीमध्ये पुरवठादाराचे नाव व पत्ता समर्थ कॉ.ऑप. कंझ्यु. सेंट्रल्स लि.शंकर मंदिर, सावरकर रस्त्याजवळ,ठाणे असा आहे. प्रत्यक्षात शॉप ॲक्टवर असलेला पत्ता डॉ. चिपकर्स बिल्डींग कार्नर, नवपाडा ठाणे असा आहे.<br>४. समर्थ कॉ.ऑप. कंझ्यु. सेंट्रल्स लि.ची संचालक मंडळाची कोणतीही यादी अथवा टेंडर फॉर्मवर सह्या करणाऱ्या अधिकारासाठी डायरेक्टर बोर्डाचे अधिकार पत्र जोडले नाही. | ……. | – |
| ६८ | बूट खरेदी पद्मयोग यांचे शॉप ॲक्टमध्ये स्टेशनरी हार्डवेअर असताना त्यांना पात्र का ठरविण्यात आले, याचा खुलासा व्हावा. तथापि समर्थ यांचे शॉप ॲक्ट असताना त्यांना अपात्र ठरविले याचा खुलासा व्हावा ? | पद्मयोग यांचे शॉप ॲक्ट मध्ये फूटवेअर असा उल्लेख आहे. | प्रत्यक्ष चौकशीच्या वेळी शॉपॲक्टवर फूटवेअर चा उल्लेख नव्हता.नंतर तो कोठून आला?मूळ शॉप ॲक्ट पहावे लागेल. | **पृष्ठ क्र ३११ वरील शॉप ॲक्ट परवाना पाहता यामध्ये फुटवेअर असा पोटउल्लेख मूळ परवाना निर्गमनाच्या दिनांकानंतर अंतर्भूत केल्याचे दिसून येते. मूळ परवाना तपासणी करणे क्रमप्राप्त आहे.** |
| ६९ | पिंपरी चिंचवड शिक्षण मंडळाने त्यांचे आदेश क्रमांक शिक्षण/लेखा/१/कावि /२६८/०८ | खुल्या निविदा प्रक्रीयीनुसार पिंपरी चिंचवड व पुणे मनपा शिक्षण मंडळात खरेदी करावयाच्या बूटांचादर्जा व ब्रॅंड चे कंपनीत फरक | ………… | **बूटांच्या दर्जाबाबत मुद्दा असलेने तांत्रिक तपासणी करून घेणे संयुक्तिक होईल.** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | नुसार दिलेल्या वर्कऑर्डर प्रमाणे मुलांसाठीचे शूज १ अधिक २ जोड मोजे च्या किंमती १६९.०० रू. दिलेले आहे. परंतु पुणे शिक्षण मंडळाने शूज साठी १९३.०० व प्रत्येकी मोजे १८.५० असे एकूण २३०रू असा इतका दर दिला आहे. एकंदरीत खरेदी करावयाच्या संखेचा विचार करिता रूपये–१,३५,२०,०००/–पिपरी चिंचवड रूपये –१,८४,००,०००/– पुणे **<u>असा अंदाजे</u>** ४९ लाखाचा फरक आढळतो. तसेच साईजप्रमाणे सखोल परिक्षण केले असता कमि जास्त होवू शकेल. यावर खात्याने अभिप्राय द्यावा. | असून पिंपरी चिंचवड शिक्षण मंउळाने पुरविलेले बूट हे १.२ एमएम या दर्जाचे आहेत, तर लीबर्टी शूज चे स्पेसिफिकेशन १.८ असे असून त्याची अथर्व लॅब व लिबर्टी प्रयोग शाळेचे तपासणी प्रमाणपत्र जोडले आहे. त्यामुळे दरामध्ये तफावत आढळून येणे क्रमप्राप्त आहे. | | |
| ७० | टेंडर फॅार्म विकत घेतल्याच्या पावत्या का दिल्या जात नाही. | निविदा फॅार्म फी भरून घेतली जाते. मात्र या कार्यालयाच्या कार्य पध्दतीमध्ये पावती देण्याची पध्दत अवलंबलेली नाही. मात्र नोंदीनुसार सदरची रक्कम त्या त्या वेळी बँकेत जमा केलीत, त्याची चलने उपलब्ध आहेत. | पावत्या न देणे गुन्हा आहे व त्यामुळे गैरप्रकाराला वाव मीळतो.तसेच शिक्षण मंडळ निविदा संच विक्रीवरील वॅट न भरून शासनाचे उत्पन्न बूडवित आहे. | **शासकिय कार्यालयात कोणत्याही रकमा विना पावतीने घेणे संयुक्तिक वाटत नाही.** |
| ७१ | पद्मयोग यांची अॅथोरायझेशन रद्द करण्याचे पत्र बाटाने दिल्यानंतर त्यांचे ब पाकीट का उघडण्यात आले? | पद्मयोग यांचे बाटा कंपनीचे मूळ अधिकार पत्र हे मुंबई येथील मेन ऑफीसचे होते. रद्द केल्याचे पत्र कलकत्ता येथील ऑफिसचे असल्याने शिक्षण मंडळाला आढळून आलेल्या तफावतीमुळे सदर पत्र शिक्षण मंडळाने ग्राहय न धरता पद्मयोग चे पाकीट क्र. २ उघडलेले आहे. | वर मुद्दा क्र २१ मध्ये प्राधिकार पत्रांची खात्री संबधित कंपन्यांच्या व्यवस्थापकाना दुरध्वनी करून करण्यात आली असे म्हटले आहे.ते खोटे आहे का?या दोन्ही कंपन्यांच्या व्यवस्थापकांशी संपर्क का साधला नाही? | **याबाबत खात्री करून घेवून निर्णय घेणे अपेक्षित होते.** |
| ७२ | यंत्रमाग मंडळाचा अनुभव वाईट आहे, हे कशाच्या आधारे ठरविले, जो पत्रव्यवहार केला याबाबतचा पत्रव्यवहार सादर करावा. | सदरची माहिती माहितीच्या अधिकारात रितसर फी भरल्यानंतर देण्यात येईल. | आम्ही प्रश्न चौकशी अधिका–यांना विचारले आहेत त्यामुळे त्यांनी चौकशी अधिका–यांना माहिती अधिकारात माहिती घेण्यास सांगीतले आहे की आणखी कोणास याचा बोध होत नाही. शिक्षण मंडळाने चौकशी अधिकाऱ्यांना माहितीच्या अधिकारात कागदपत्र उपलब्ध करुन घेण्यास सांगीतले असेल तर त्याचा निर्णय चौकशी अधिकाऱ्यांनी स्वत: घ्यावा.परंतू हि सर्व कागदपत्रे रेकॉर्डवर आणावीत व आम्हालाही द्यावित. | **यासंदर्भात शिक्षण प्रमुख यांनी प्रत्यक्ष चर्चेत ४८००० मी पैकी ९४ मी कापड खराब निघाल्याचे तसेच पुरवठा वेळेत न केल्याचे नमुद केले आहे. यावरून यंत्रमाग मंडळाचा अनुभव खराब असल्याचे शिक्षण मंडळाने ठरविले असून मा. मुख्य सभेने ब्रॅण्डेड वस्तू घेणेचा ठराव केला आहे.** |
| ७३ | विद्यार्थी व विद्यार्थीनी यांना एकाच प्रकारच्या कापडाचे गणवेश शिलाई करण्याचा निर्णय कोणाचा आहे ? | विद्यार्थ्यांच्या गणवेशाच्या सुटींग व शर्टीगचे कापडा प्रमाणेच विद्यार्थीनीच्या पिनोफ्रॅक व सलवार कुडतासाठीही नमुन्या प्रमाणे दोन्हीही प्रकारच्या कापडाचा गणवेश शिलाई करण्याचा निर्णय स्पेसीफिके शन ठरविताना शिक्षण मंडळाने घेतला आहे. | शिक्षण मंडळाच्या बैठकीचा इतिवृत्तांत देणे. विद्यार्थीनींना शर्टच्या कापडाचा सलवार कमीज शिवणे योग्य आहे. असे ज्या सदस्यांनी म्हटले त्यांची नावे जाहीर व्हावीत. | **असे इतिवृत्त प्रकरणात आढळून येत नाही.** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **७४** | सर्व पात्र ठेकेदारांचे मालक/ भागीदारांची नावे व पत्ते व ब पाकिटाचे, दरपत्रकाचे पाकीटांची झेरॉक्स देणे ? | माहिती अधिकाराच्या अधिकारात माहिती देणेत येईल. | आम्ही प्रश्न चौकशी अधिका–यांना विचारले आहेत त्यामुळे त्यांनी चौकशी अधिका–यांना माहिती अदिकारांतर्गत माहिती घेण्यास सांगीतले आहे की आणखी कोणास याचा बोध होत नाही. शिक्षण मंडळाने चौकशी अधिकाऱ्यांना माहितीच्या अधिकारात कागदपत्र उपलब्ध करुन घेण्यास सांगीतले असेल तर त्याचा निर्णय चौकशी अधिकाऱ्यांनी स्वत: घ्यावा.व आम्हाला कागदपत्रे दाखवावीत. परंतू हि सर्व कागदपत्रे रेकॉर्डवर आणावीत | **–** |
| **७५** | पाकीट क्रमांक १ उघडताना ठेकेदारांचे उपस्थिती रजिस्टर नव्याने का करण्यात आले ? खुलासा करावा. | नवीन शैक्षणिक वर्षातील खरेदी प्रक्रीया असल्याने नवीन रजिस्टर ठेवण्यात आले आहे. | हे रजिस्अर नविन करण्यात आले कारण काहीतरी लपवायचे होते.या रजिस्टरच्या खरेपणाबाबत चौकशी अधिका–यांनीही प्रश्न विचारले परतू श्री.तांबे यांना त्याचा खूलासा करता आला नाही. | **या रजिस्टरमध्ये झालेल्या कार्यवाहीचा तपशील नमुद नसून केवळ सह्या आहेत. यावरून नेमकी काय कार्यवाही केली गेली याचा काही बोध होत नाही.** |

उप आयुक्त
भूसंपादन व व्यवस्थापन
दक्षता विभाग
पुणे महानगरपालिका